
# श्री सिद्धारूढस्वामी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १३०३



REFBK-0010958

-चरित्रमाला

# श्री सिद्धारूढ स्वामी

( हुबळी )

1303

संतचरित्र माला : ९ :

*

द. म. खेर

REFBK-0010958

*

मूल्य सव्वा रुपया

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

संतचरित्र माला : ९

श्री : २८२

© १९६०
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई

*

आवृत्ति पहिली
१९६०

*

मूल्य रु. १-२५

*

पृष्ठसंख्या ८४

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेडकरितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

*

मुद्रक :
गं. शं. दाते
कलागृह छापखाना
६६६ सदाशिव पेठ, पुणें २

## संतचरित्र-माला

★ श्रीवासुदेवानंद सरस्वती
अर्थात् टेंबेस्वामी
★ श्रीगजानन महाराज
शेगांव-(वऱ्हाड)
★ श्रीमाणिकप्रभु, माणिकनगर
★ श्रीबीडकर महाराज, पुणें
★ श्रीगुलाबराव महाराज, वऱ्हाड
★ श्रीगुप्ते-गजानन महाराज, नाशिक
★ श्रीसिद्धारूढस्वामी, हुबळी
★ श्रीमाधवनाथ महाराज, इंदूर
★ श्रीअक्कलकोटस्वामी, अक्कलकोट
★ श्रीगोंदवलेकर महाराज, गोंदवलें

महाराष्ट्रांतील अलीकडच्या काळांतील
अशीं अनेक श्रेष्ठ संतांचीं चरित्रें
**मूल्य प्रत्येकीं रु. १-२५**

* *

तसेंच महाराष्ट्रांतील
आधुनिक विद्यमान संतश्रेष्ठ
**श्रीमत् प. प. श्रीधरस्वामी महाराज**
यांचें चरित्र : पहिला भाग : साधना
**मूल्य रु. १-५०**

मराठी ... स्थळप्रत.

## उपोद्घात

हुबळी येथें सिद्धारूढस्वामी या नांवाचे ख्यातनाम सिद्धपुरुष होऊन गेले. त्यांच्या चरित्रावरून त्यांना जन्मजात सिद्धी प्राप्त झाल्या होत्या हें वाचकांना आढळून येईल. लहान असतांनाच गुरूच्या शोधार्थ त्यांनीं अनेक ठिकाणीं पायीं प्रवास केला व तीर्थयात्राहि केल्या. अखेरीस त्यांनीं हुबळी येथें कायम वास्तव्य केलें; आणि केवळ लोकांचा उद्धार करण्यांत आपलें आयुष्य खर्च केलें.

ते शिवभक्त होते. त्यांनीं अगणित माणसांना " नमः शिवाय " या शिवपंचाक्षरी मंत्राचा उपदेश दिला व त्यांना उपासनामार्गाला लावलें.

वेदान्तशास्त्रांत ते प्रवीण होते. लोकांना ते वेदान्ताचा बोध करीत व अगदीं सामान्य माणसांना नामस्मरण करावयास सांगत.

त्यांनीं आपल्या आयुष्यांत अनेक लोकांचीं संकटें निवारण केलीं व कांहीं मृत माणसेंहि उठविलीं. असे लोकोत्तर चमत्कार त्यांनीं केले यामुळें लोक त्यांना शिवावतार समजत.

त्यांची चरित्रें कांहीं मराठींत व कानडींत प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत स्वामींच्या अनेक चमत्कारांचें विस्तारानें वर्णन केलें आहे. प्रस्तुत चरित्रांत ते सर्व चमत्कार देणें शक्य नाहीं, परंतु यांत त्यांच्यासंबंधीं जी माहिती दिली आहे तिच्यावरून स्वामींचा अधिकार किती मोठा होता याची कल्पना वाचकांना सहज येऊं शकेल.

एका ओवीबद्ध मराठी चरित्रांतील प्रत्येक अध्यायांत या चरित्रकारानें स्वामींसंबंधानें कांहीं माहिती देऊन तिच्यांतून त्यानें आपल्या समजुती-प्रमाणें कांहीं लक्ष्यांश काढलेला आहे. परंतु त्याची विशेष गरज न वाटल्या-मुळें या पुस्तकांत त्याचा समावेश केला नाहीं.

हें अल्पचरित्र वाचकांना उद्बोधक होईल अशी अशा बाळगतों.

लेखक

## श्री सिद्धारूढ स्वामी


| | | |
|---|---|---|
| १ | मुलाचे पाय पाळण्यांत | ५ |
| २ | गुरूचा शोध | ११ |
| ३ | संचार | १५ |
| ४ | अमोल ठेवा | १८ |
| ५ | भक्तसंकट-निवारण | २३ |
| ६ | अभिमानाचें निराकरण | २७ |
| ७ | सिद्धांच्या कृपेनें कल्याण | ३१ |
| ८ | भक्तांचें संकटनिवारण | ३७ |
| ९ | गंगायमुना संगम | ४१ |
| १० | साक्षात् शिवाचा अवतार | ४६ |
| ११ | भक्तांची हांक | ५२ |
| १२ | शरणाला अभय | ५९ |
| १३ | भक्तांचा कैवारी | ६४ |
| १४ | मुलाला संजीवन | ६८ |
| १५ | महाप्रयाण | ७३ |



श्री सिद्धारूढस्वामी

१०९५८

## मुलाचे पाय पाळण्यांत : १

कर्नाटक प्रांतांत वंशादुर्ग नांवाच्या गांवांत गुरु शांतप्पा म्हणून एक गृहस्थ रहात होता. तो शिवभक्त होता. त्याच्या पत्नीचें नांव देवमल्लम्मा असें होतें. त्यांना तीन मुलें होतीं. त्यांपैकीं तिसऱ्याचें नांव सिद्ध असें होतें. तो शके १७५८ दुर्मुखनाम संवत्सरांत चैत्र शुद्ध नवमीला जन्मला.

त्याचे आईवडील नेहमीं ईश्वरपूजनांत मग्न असत. या गोष्टीचे संस्कार लहानपणापासून सिद्धाच्या मनावर झाले होते. सर्वांभूतीं परमेश्वर आहे हें तत्त्व त्याच्या कोमल अंतःकरणांत रुजलेलें होतें. शक्यतों आपण सर्वांना सुखी करावें असें त्याला नेहमीं वाटत असे.

एकदां तो लहान असतांना आपल्या मित्रांबरोबर खेळत होता. तेव्हां कांहीं मित्रांनीं त्याच्याजवळ तीळ मागितले. तेव्हां सिद्ध आपल्या मित्रांना घेऊन घरीं आला आणि एका शिंक्यावर टांगून ठेवलेल्या एका मडक्याला त्यानें काठी मारून भोंक पाडलें. त्याबरोबर मडक्याच्या भोंकांतून खालीं तिळांची धार लागली. सर्व मुलांनीं जमिनीवर पडलेल्या तिळांच्या राशींतून यथेच्छ तीळ भरून घेतले. तरी मडक्याच्या भोंकांतून तिळाची धार खालीं पडतच होती. एवढ्या लहान मडक्यांतून तिळाची सारखी धार लागली आणि जमिनीवर तिळाचा प्रचंड ढीग झाला. हें पाहून सर्वजण आश्चर्यानें थक्कच झाले. गांवकरी लोकांना हा अलौकिक चमत्कार जेव्हां समजला तेव्हां अनेक लोक शांतप्पाच्या घरीं येऊन तो तिळाचा ढीग पाहून गेले. सर्वांनीं क्यास केला कीं, सिद्ध हा सामान्य मुलगा नसून तो शंकराचा अवतार आहे.

आईनें सिद्धाला विचारलें, “ बाळ, इतक्या लहान मडक्यांतून तिळाचा एवढा मोठा ढीग कसा पडला ? ”

सिद्ध म्हणाला, " आई, हा तुझ्या गुरुसेवेचा महिमा आहे. माझें शरीर म्हणजेच मडकें. लहानपणीं तुझ्या मांडीवर बसून ऐकलेलीं ज्ञानोपदेशाचीं वाक्यें म्हणजे तीळ. तूं आपल्या गुरूची अखंड सेवा केल्यामुळेंच ही गोष्ट घडून आली. "

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात अशी एक म्हण आहे. सिद्धाच्या बाबतींत तिचा अनुभव वरच्यावर येऊं लागला. मल्लम्मानें सिद्धाला शाळेंत घालण्याचें जेव्हां मनांत आणलें तेव्हां सिद्ध तिला म्हणाला, " अंतर्बाह्य अशी शाळा असतांना मीं साध्या मायावी शाळेंत कशाला जाऊं ? तूं सांगतेस त्या शाळेंत मी गेलों तर मला फक्त लौकिक विद्या मिळेल आणि तिच्यामुळें मी संसारबंधनाच्या उपाधींत गुरफटून जाईन. माझ्या अज्ञानाचा निरास होऊन मला खरें ज्ञान प्राप्त होणार नाहीं. खरें ज्ञान मिळविण्यासाठीं माझ्याजवळ अंतर्बाह्य अशी शाळा आहे. मनुष्याला उघड्या डोळ्यांनीं जसें शिवदर्शन होतें, तसेंच तो अंतर्मुख झाला असतांना देखील अंतर्यामीं शिवदर्शन होतें. जिवाशिवाचें ऐक्य झालें असतां मनुष्याचा जन्म सफल होतो आणि तो जन्ममरणाच्या फेऱ्यांतून कायमचा सुटतो. असें असतां तूं मला या लौकिक शाळेंत जाण्याचा आग्रह कशाला करतेस ? "

लहान वयांत सिद्धाचे हे प्रगल्भ विचार झालेले पाहून सिद्धाच्या मातेला विलक्षण आश्चर्य वाटलें आणि तिनें त्याच्या विचारांना पोषक अशी वेदान्तश्रवणाची सोय करून दिली.

सिद्धाच्या ठिकाणीं लहानपणापासूनच अलौकिक सामर्थ्य असल्याचें दिसून येत असे. एके दिवशीं त्याच्या घरांतील म्हैस बसली असतां तो तिच्या पाठीवर बसला आणि तिला उठवूं लागला. ती कांहीं केल्या उठेना तेव्हां सिद्धानें " तूं मरशील " असा तिला शाप दिला. सिद्धानें शापवाणी उच्चारल्याबरोबर त्या बिचाऱ्या म्हशीचा प्राण निघून गेला. म्हैस मेल्याची बातमी मल्लम्माला समजली तेव्हां ती म्हशीजवळ आली आणि शोक करूं

लागली. तिनें सिद्धाला म्हैस मारण्याचें कारण विचारलें. सिद्धानें घडलेली सर्व हकीगत तिला सांगितली. मातेचा शोक कमी होईना तेव्हां सिद्ध तिला म्हणाला, " आई, तूं म्हशीसाठीं एवढा शोक कशाला करतेस ? मी तुझी म्हैस आतां उठवतों. "

असें म्हणून त्यानें " ॐ नमः शिवाय " हा शिवषडक्षरी मंत्र उच्चारला आणि म्हशीच्या अंगावरून हात फिरविला. तेव्हां ती म्हैस तत्काळ जिवंत झाली. हें पाहून मल्लाम्माला मोठें नवल वाटलें आणि तिनें सिद्धाचें कौतुक केलें.

असाच एकदां सिद्ध आपल्या सवंगड्यांबरोबर पोहण्यास गेला. त्या सवंगड्यांपैकीं एक मुलगा पाण्यांत उतरावयास घाबरत होता. सिद्धानें त्याला पाण्यांत बुडविलें आणि तो म्हणाला, " आतां याच्या कुडींतून प्राण निघून गेला असल्यानें याला कसलीच भीति उरली नाहीं. "

तो आपल्या आईचा एकुलता एक मुलगा होता. मुलगा पाण्यांत बुडाला ही बातमी तिला समजल्याबरोबर ती आक्रोश करीत तेथें गेली आणि मुलगा कसा बुडाला म्हणून तेथें असलेल्या मुलांना विचारूं लागली.

सिद्ध म्हणाला, " तुमचा मुलगा पाण्यांत जाण्याला भीत होता म्हणून मीं त्याला पाण्यांत बुडविलें आणि भयापासून मुक्त केलें. तो आतां जलरूपीं ब्रह्मांत अगदीं आनंदांत–ब्रह्मानंदांत–असेल. त्याला अज्ञानामुळें जलाची–ब्रह्माची–भीति वाटत होती. म्हणून मी त्याचा देहाविषयीं असलेला अहंकार नष्ट करून त्याला पाण्यांत म्हणजे ब्रह्मांत बुडवून टाकलें. "

त्या मुलाच्या आईला याप्रमाणें सांगून सिद्धानें तिचें समाधान करण्याचा यत्न केला; पण तिला पुत्रविरहाचें दुःख अनावर झालें होतें. तिला तिचा मुलगा हवा होता. सिद्धाचा वेदान्त नको होता. तिचा विलाप ऐकून सिद्धाला तिची करुणा आली आणि तो शेवटीं बाईला म्हणाला, " बाई, वृथा शोक कशाला करतां ? तुम्हांला तुमचा मुलगा

खरोखर हवाच असेल तर त्याला हांक मारा म्हणजे तो पाण्यांतून वर येईल ! ”

सिद्धाचे हे शब्द ऐकून बाईनें मुलाला हांक मारली आणि चमत्कार असा कीं, तिनें हांक मारतांच तो बुडालेला मुलगा खोल पाण्यांतून वर आला. तें पाहून सिद्धाच्या संवगड्यांचा जीव खालीं पडला आणि त्यांनीं समाधानाचा सुस्कारा टाकला. सिद्ध हा साक्षात् शिवावतार असल्या-बद्दल त्यांची खात्री झाली.

बाळपणांतच सिद्धानें असे अनेक लोकोत्तर चमत्कार केल्यामुळें लोक त्यांचा उपदेश घेऊं लागले आणि त्याच्यापाशीं वेदान्त शिकूं लागले. वीरभद्रस्वामी हे सिद्धाचे कुलगुरु होते. ते प्रतिदिवशीं मल्लम्माला वेदान्त-निरूपण करीत असत. सिद्ध आपल्या मातेच्या मांडीवर बसून तें निरूपण नियमानें ऐकत असे. यामुळें सिद्धाला बाळपणांतच वेदान्ताचें ज्ञान झालें होतें. त्याच्या बालमनावर वेदान्ततत्त्वांचा उत्कृष्ट परिणाम झाला होता, आणि त्याच्या बुद्धीचा विकास झाला होता. स्वामी वीरभद्र जीं वेदान्ताचीं तत्त्वें सांगत त्यांत सिद्धाला कांहीं शंका येत असत, त्यांचें निवारण होऊन आपल्याला विषयाचें परिपूर्ण ज्ञान व्हावें अशी सिद्धाला उत्कट इच्छा असे.

एके दिवशीं सिद्धानें स्वामींना असेच कांहीं प्रश्न विचारले असतां स्वामी म्हणाले, “ आपले प्रश्न योग्य गुरूला विचारून त्याच्याकडून आपलें समाधान करून घ्यावें. ” स्वामींचे हे शब्द ऐकले मात्र तत्क्षणींच सिद्धाला योग्य गुरु शोधून काढण्याचा ध्यास लागला. दुसऱ्या दिवशीं तो घरीं कोणाला न सांगतां गुरूच्या शोधार्थ निघाला. जातांना त्याच्याबरोबर त्याचे मित्र भीम आणि सोम हे निघाले; परंतु बालवयांत गुरूचा शोध, वेदान्त आणि परमार्थ या अगदीं खुळचटपणाच्या कल्पना आहेत, असा त्या मित्रांचा समज झाला होता. या गोष्टी म्हातारपणींच करावयाच्या असतात असें त्यांचें ठाम मत होतें. सिद्धाला वाटे कीं, तारुण्यांत इंद्रियांना

त्यांच्या विषयांचा उपभोग घेण्याची चटक लागली कीं, मनावर तिचे इतके अनिष्ट परिणाम होतात कीं, वृद्धापकाळांत परमार्थ साधावयाचा झाल्यास तारुण्यांतील विषयोपभोगांचे संस्कार परमार्थाच्या मार्गांत विघ्नरूपानें उभे राहतात. म्हणूनच लहानपणापासून परमार्थाचें साधन करणें अतिशय आवश्यक आहे. सिद्धाचे हे विचार पोक्तपणाचे आणि शहाणपणाचे नाहींत असें कोण म्हणेल ?

सिद्ध व त्याचे मित्र असे त्रिवर्ग आपला मार्ग चालूं लागले. वाटेनें जातांना त्यांना अनेक प्रकारच्या संकटांना तोंड द्यावें लागलें. भीम आणि सोम यांना प्रवासांत मनस्वी त्रास झाला. सुखदुःखांना समान लेखणारा सिद्ध अशा संकटांना थोडाच जुमानतो ! ' गुरूचा शोध ' एवढ्याच ध्येयावर त्याचें चित्त खिळलेलें होतें. त्यामुळें इतर गोष्टींविषयीं त्याला कसलेंहि भान राहिलें नव्हतें. चालतां चालतां हे तिघे प्रवासी एका गांवाला जाऊन पोंचले आणि तेथें असलेल्या बसवेश्वराच्या देवळांत जाऊन उतरले. सिद्ध व त्याचे मित्र चालून चालून अगदीं थकून गेले होते. भीम व सोम यांना जमिनीवर अंग टाकल्याबरोबर गाढ झोंप लागली; पण सिद्ध मात्र बसवण्णाच्या मूर्तीचें ध्यान करीत बसला. ध्यान करतां करतां त्यानें आपलें अंग बसवेश्वराच्या मूर्तीवरच टाकून दिलें आणि तेथेंच त्याला गाढ झोंप लागली.

ती रात्र संपली; परंतु त्या तिघांची झोप मात्र संपली नव्हती. ते तिघेहि आपआपल्या जागीं निश्चेष्ट पडले होते. सकाळीं नेहमींच्या नियमाप्रमाणें पुजारी देवालयांत आला. त्याला हीं तीन मुलें तेथें झोपीं गेलेलीं दिसलीं. सिद्ध तर मूर्तीवर पडलेला पाहून पुजारी फारच संतापला. त्यानें सिध्दाला मूर्तीवरून खालीं येण्यास सांगितलें. तो खालीं उतरेना. तेव्हां पुजाऱ्यानें त्याला मारलेंहि; तरीसुध्दां तो खालीं येईना. नंतर पुजाऱ्यानें त्याला नम्रतेनें विचारलें, " अरे, तुझी देवावरील श्रद्धा गेली तरी कोठें ? "

तेव्हां सिद्ध म्हणाला, " माझी भक्ति आणि श्रद्धा या मूर्तीला व्यापून राहिलेल्या परमात्म्यांत लीन झालेली आहे; पण तुझी मात्र या मूर्तीच्या दगडावर खिळून राहिली आहे. मी या दगडावर वसून जड कोण आहे हें पाहात होतों. "

वयातीत आणि अनुभवी माणसांच्यासारखे तात्विक बोल त्या बालकाच्या मुखांतून बाहेर पडलेले ऐकून पुजारी विस्मित झाला आणि सिद्ध आपल्याहून लहान आहे इकडे लक्ष न देतां पुजारी त्याच्या पायां पडला. सिद्धानें त्याला सांगितलें कीं, " मूर्तिपूजेपेक्षां महात्म्याची पूजा श्रेष्ठ होय. मातेनें खाल्लेल्या अन्नानें तिच्या गर्भांत असलेल्या बालकाचें जसें पोषण होतें त्याचप्रमाणें महात्म्याच्या पूजनानें परमात्मा तृप्त होतो. "

* * *

मराठी ... स्थळप्रत.

## गुरूचा शोध : २

सिद्ध त्या गांवांतून निघून गुरूच्या शोधार्थ पुढें चालूं लागला. त्याचे मित्र भीम आणि सोम यांना प्रवासाचे क्लेश असह्य झाले होते. त्यांना प्रवासाचा शीण आला होता यामुळें सिद्धाबरोबर पुढें जाण्याचें त्यांना धैर्य होईना. शिवाय जशी सिद्धाला सद्‌गुरूची प्राप्ति करून घेण्याची मनापासून तळमळ लागून राहिली होती तशी त्याच्या मित्रांना प्रवास करण्यांत कोणत्याहि प्रकारची तळमळ नव्हती. या कारणामुळें त्यांनीं सिद्धाबरोबर जाण्याचा विचार रहित केला आणि ते सिद्धाची परवानगी घेऊन मागें फिरले आणि आपल्या गांवीं परत आले.

आतां सिद्ध प्रवासांत एकटाच होता. यामुळें तो सद्‌गुरूच्या शोधासाठीं खूप भटकला. त्यानें हैद्राबाद गांठलें आणि तेथून गोवळकोंडें येथें तो आला. नंतर तिमरलंकाच्या भव्य गुहेमध्यें तो ध्यानस्थ बसला. त्या ठिकाणीं चित्तवृत्तीचा उपशम झाला असतां त्याला वाटलें कीं, दाक्षिण दिशेला दक्षिणामूर्ति सांप्रदायाचे आचार्य आहेत. त्या ठिकाणीं आपल्याला सद्‌गुरु भेटतील. सिद्धाला एकाग्रतेंत हें जें स्फुरण झालें त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून सिद्ध तडक श्रीशैल्याला गेला, आणि तेथील सूर्यसिंहासनस्थ मठाधिपतीला भेटला. नंतर " चित्तशुद्धि कशी होईल ? ज्ञानप्राप्ति करून घेण्याचीं साधनें कोणतीं ? " हे व अशासारखे प्रश्न त्यानें मठाधिपतीला विचारले. ते प्रश्न ऐकून त्या मठाधिपतिस्वामींना वाटलें कीं इतक्या अल्पवयांत असे प्रश्न विचारणारा हा मुलगा सामान्य कोटींतील नसून याचा अधिकार फार मोठा असला पाहिजे. म्हणून स्वामींनीं मोठ्या आदरानें त्याची विचारपूस केली; परंतु त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें स्वामींकडून मिळालीं नाहींत. यामुळें त्याची निराशा झाली.

सिद्धानें तें गांव सोडलें आणि तो राचोटीला आला. तेथें भद्रादि

नवनंदीचें दर्शन घेऊन तो दक्षिणेकडे जाण्यास निघाला. कोणत्याहि लौकिक दुःखाची तमा न बाळगतां त्यानें अन्न वर्ज्य केलें. रात्रंदिवस त्याला सद्‌गुरुप्राप्तीचा ध्यास लागला होता. तो तळमळून परमेश्वराला उद्देशून म्हणे, " देवा, मला सद्‌गुरूची भेट करून दे रे. "

एकदां त्यानें देवाची अशी कळवळून प्रार्थना केली आणि तो जमिनीवर बेशुद्ध होऊन पडला. अशा स्थितींत त्याला असा भास झाला कीं, सद्‌गुरूनें आपल्याला पोटाशीं धरलें आहे आणि ते म्हणत आहेत कीं, " बाळा, तूं धैर्य सोडूं नकोस. "

हे शब्द ऐकून त्यानें डोळे उघडले तेव्हां त्याला तेथें कोणीहि दिसलें नाहीं. त्याला वाटलें होतें कीं, आपल्या भाग्याचा क्षण आला; पण त्याची पूर्ण निराशा झाली ! तो उद्‌गारला, " गुरुमाउली, तूं कां बरें माझा अंत पाहात आहेस ? तुझ्या प्राप्तीसाठीं मी किती तरी हिंडलों, हालअपेष्टा सहन केल्या, तरी तुला अजून माझी करुणा कशी येत नाहीं ? किती मी दुर्दैवी कीं अजूनहि मला तुझा ठाव लागूं नये ? तरी आतां प्रसन्न हो, मला मायामोह यांपासून सोडव आणि मला आत्मप्राप्तीचा मार्ग दाखव आणि हे सद्‌गुरो, आतां जर तूं मला भेटला नाहींस तर मात्र मी तुझ्यावर लक्ष ठेवून प्राण दिल्यावांचून राहणार नाहीं ! "

सिद्धानें याप्रमाणें करुणा भाकली असतां त्या दयाघन प्रभूनें एका वृद्ध साधूच्या वेषानें त्याला दर्शन दिलें. त्यानें सिद्धाचा हात धरून त्याला उठविलें व त्याला तो म्हणाला, " बाळ, तूं धन्य आहेस. सर्व लोक केवळ ऐहिक सुखाची इच्छा करतात. तुला मात्र आत्मानुभवाची तीव्र इच्छा आहे. तेव्हां तुला आतां सद्‌गुरुनाथ लवकरच भेटेल. तूं विलंब न लावतां मल्लिकार्जुनक्षेत्राला जा. तेथें गुडगुंटी अमरगुंडला कट्टेमठाचे गजदंड नांवाचे मुख्य स्वामी आहेत. त्यांची तूं सेवा कर म्हणजे तुला आत्मज्ञान होईल. तें स्थान येथून जवळच आहे. "

असें सांगून तो वृद्ध साधु अदृश्य झाला. त्या वृद्ध साधूच्या आज्ञे-प्रमाणें सिद्ध गुडगुंटीस जाऊन मंदिराच्या बाहेर उभा राहिला. नित्य कर्में उरकून गुरु गजदंड मंदिराबाहेर आल्यावर सिद्धानें त्यांना अत्यंत नम्रतेनें वंदन केलें व गुरुकृपा व्हावी म्हणून दीनवाणीनें त्यांची प्रार्थना केली. गुरूंनीं त्याच्या अंतरीचा भाव ओळखला; पण त्याची परीक्षा पाहण्याच्या हेतूनें प्रथम त्यांनीं सिद्धाकडे लक्षच दिलें नाहीं. सिद्ध मात्र त्यांना अनन्यभावानें शरण गेला आणि त्यानें त्यांची सेवा करण्यास आरंभ केला. तो गुरूचीं सर्व कामें मन लावून आनंदानें करीत असे. त्याचप्रमाणें त्यांच्या मठांतील सर्व कामें बिनबोभाट करीत असे. स्वतःचा निर्वाह मात्र तो पांच घरें मधुकरी मागून तिच्यावर करी. गुरुघरचें अन्न तो खात नसे. मंदिरांत नित्य शास्त्रपठण चालत असें.

एके दिवशीं सुब्बय्याशास्त्री नांवाचा महान् पण गर्विष्ठ पंडित गजदंडां-कडे आला आणि म्हणूं लागला कीं, “ उपनिषदांचा योग्य अर्थ सांगणारा माझ्याशिवाय दुसरा कोण आहे ? ”

त्या बाबतींत कोणीहि येऊन सभेंत त्याच्याशीं चर्चा करावी असें त्यानें आव्हान दिलें. त्याच्या गर्वाचा परिहार करण्यासाठीं गजदंड-स्वामींनीं सिद्धाला प्रेरणा दिली. गुरूच्या परवानगीनें सिद्धानें म्हटलें, “ ब्रह्म व आत्मा यांचें संपूर्ण ऐक्य म्हणजेच उपनिषद्—ब्रह्मविद्या. ”

तेव्हां सुब्बय्यांनीं पुन्हां विचारलें, “ उपनिषद् म्हणजे विद्या कशी काय म्हणतां येईल ? ”

यावर सिद्ध उत्तरला, “ उपनिषद् म्हणजेच विद्या; कारण मुमुक्षु मनानें इंद्रियांचें दमन करून उपनिषदांच्या वाक्यार्थाचें मनन करतात; त्या योगें मुमुक्षूंना आत्मज्ञान होतें, त्यांच्या अज्ञानाचें संपूर्ण निरसन होतें आणि जीवाचें भवबंधन तुटतें. म्हणून विद्या म्हणजे उपनिषद् होय. ”

हें विवरण ऐकून शास्त्र्यांना समाधान वाटलें.

सिद्धाची बुद्धिमत्ता पाहून गजदंडांना आनंद झाला. तेव्हांपासून त्या गुरुशिष्यांत नेहमीं वेदान्ताची चर्चा चाले. सिद्धानें गुरूंना विचारलें कीं, " या द्वैतविद्येंत अहम् व आत्मा यांचें ऐक्य कसें होतें ? "

गुरु म्हणाले कीं, " जोंपर्यंत जीवाला देहाबद्दल आत्मबुद्धि असते तोंपर्यंत द्वैताचा भास होतो व एकदां का देहाभिमान नष्ट झाला कीं ऐक्यज्ञान प्राप्त होतें. "

अशा तऱ्हेनें त्या गुरुशिष्यांत नेहमीं अध्यात्मविषयक चर्चा चालत असे.

कालांतरानें गजदंडांना कळून आलें कीं, सिद्ध आतां निर्गुणावर आरूढ झाला आहे आणि तेव्हांपासून त्यांनीं त्याचें नांव सिद्धारूढ असें ठेवलें. ते त्याला म्हणाले, " मल्लिकार्जुनाच्या कृपेनें आतां तुला ज्ञान प्राप्त झालें आहे. तूं यापुढें तुला जे मुमुक्षु भेटतील त्यांचा उद्धार कर. तुझ्यांत आणि माझ्यांत आतां भेद राहिला नाहीं. तुझें आणि माझें ज्ञान अगदी सारखें आहे. तरी तूं आतां तीर्थाटनाला जा आणि तुला जे साधु आणि मुमुक्षु भेटतील त्यांना वेदान्तांतील तत्त्वें सांगत जा ! "

* * *

## संचार : ३

याप्रमाणें गुरूची आज्ञा झाल्यावर सिद्धारूढ तीर्थाटनाला निघाला. तो प्रथम किष्किंधेला गेला आणि त्यानें विरूपाक्षाचें दर्शन घेतलें. नंतर तो हेमकूट पर्वतावर जाऊन तेथें समाधियोग पुरा करण्यासाठीं एकान्तांत बसला. तो योग पुरा झाल्यावर पंपाक्षेत्र, वसिष्ठाश्रम, स्फटिकशिलेची तपोभूमि, चिंतामणिआश्रम वगैरे ठिकाणीं जाऊन तो तिरुपतिक्षेत्रांत आला. तेथें त्याची वृत्ति ब्रह्मचिंतनांत गढलेली असे. " शय्या भूमितलं दिशोपि वसनम्" अशी त्याची वृत्ति असे. कधीं कांहीं खावें नाहीं तर खाण्यावांचून तसेंच राहावें अशा त्याच्या वृत्तीमुळें कोणी त्याला वेडा म्हणत तर कोणी ज्ञानी समजत. नंतर सिद्धारूढ तेथून निघून कुंभकोण, तंजावर, जंबुकेश्वर, मदुरा, कावेरीतीर, रामेश्वर आणि धनुष्कोटी वगैरे ठिकाणीं गेला. मार्गानें जातां जातां त्यानें पुष्कळ लोकांचा उद्धार केला.

अशाच एका मुमुक्षूनें सिद्धारूढाला प्रश्न केला कीं, " मन हें सदैव चंचल असतें याचें कारण काय? व तें कसें आवरावें? "

सिद्धारूढ म्हणाले, " मन हें वायु व रजोगुण यामुळें चंचल बनतें. मनानें वायूचा अर्धा भाग घेऊनच तें तयार झाल्यामुळें त्याला चंचलता येणें स्वाभाविक आहे. रजोगुणामुळें विकल्प येतो. तेव्हां प्राणायामानें मनाचा वेग आवरावा आणि निर्धारानें किंवा विवेकानें विकल्पावर विजय मिळवावा. विवेक करण्यासाठीं मनुष्यानें नेहमीं सत्संगतींत राहावें. "

सिद्धारूढ एकदां पद्मनाभपुरींत असतांना तेथें कोणाची तरी पूजा चालली होती आणि त्या निमित्तानें ब्राह्मण भोजनाला बसले होते. त्यांच्याच पंक्तीला सिद्धारूढ जाऊन बसला. तें पाहून ब्राह्मण फार संतापले आणि ते सिद्धारूढाला म्हणाले, " तुला शेंडी किंवा यज्ञोपवीत नसतां तूं ब्राह्मणांच्या पंक्तीला कसा बसलास? "

सिद्ध म्हणाला, " माझीं ब्रह्मचिन्हें तुम्हाला कशीं दिसणार ? शेंडी किंवा जानवें नसलेल्या यतीनें इच्छारहित असावें."

यावर ब्राह्मण म्हणाले, " तूं यतीचे नियम तरी कुठें पाळतोस ?"

यावर सिद्धारूढ म्हणाला, "ज्ञान हेच आमचे नियम, समता हीच आमची कंथा, वैराग्य हेंच भस्म आणि तत्त्वविवेचन हाच आमचा कमंडलु होय !"

सिद्धारूढाचें हें भाषण ऐकून ब्रह्मवृंद खजील झाला.

तेथून सिद्धारूढ उडुपी, गोकर्णमहाबळेश्वर, हुबळी, पंढरपूर, नाशिक, उज्जयिनी करून ॐकारेश्वराला आला. ठिकठिकाणचीं क्षेत्रें पाहावींत, लोकांना सन्मार्गदर्शन करावें हेंच सिद्धाचें सत्कार्य होतें. त्यानें भारतांतील अनेक गांवें पाहिलीं आणि प्रत्येक धर्माच्या तत्त्वांचा अभ्यास केला.

असेंच फिरत फिरत सिद्धारूढ गयेला गेला. तेथें एक गवई शंकरापुढें भैरवी रागांतील एक चीज म्हणत होता. सिद्धारूढ त्याला म्हणाला, " आतां शंकराच्या उपासनेची वेळ आहे. या वेळीं तुम्ही शंकराभरण रागांतील चीज गा म्हणजे शंकर प्रसन्न होईल."

गवयानें त्याला प्रश्न केला, " या वेळीं शंकराभरण रागच कां म्हणायचा ?"

यावर सिद्धारूढानें त्यांना उत्तर दिलें कीं, " शंकराभरण म्हणजे कुण्डलिनी व त्या रागाचें योग्य काळीं गायन केलें तर तो राग प्रसन्न होतो. कुण्डलिनी जागृत होऊन ब्रह्मरंध्रांत जाते व त्यामुळें परमानंद होतो."

रागाचें हें वर्णन ऐकल्यामुळें गवयाला ब्रह्मवेत्ता भेटल्याचा आनंद झाला. " रागाचीं उत्पत्तिस्थानें कोणतीं ?" असें गवयानें विचारलें असतां सिद्धारूढ म्हणाला, " ईश्वराच्या सप्तमुखांतून षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत आणि निषाद असे सप्तस्वर निघाले. तेच या शरिरांत गळा, डोकें, नाक, हृदय, तोंड, टाळू व पूर्वांग या स्थानांत अनुक्रमें

उत्पन्न होतात. राग गाण्याची वेळ मध्यान्ह, सायंकाळ, पूर्वरात्र व रात्रींचा शेवटचा प्रहर अशी आहे. जो गवई हे सप्तस्वर आपल्या शरिरांतील उद्भवस्थानीं नेऊन गातो तो ईश्वराच्या कृपेनें सज्ञानी होईल. गायन हें नेहमी ईश्वराकरितां करावें."

नंतर सिद्धारूढ कलकत्ता, जगन्नाथपुरी वगैरे ठिकाणीं जाऊन समुद्रतीरीं असलेल्या कबीरदासाच्या मंदिरांत गेला. तेथील संतलोकांना सिद्धारूढ म्हणाला, "वाल्मीकीनें रामायण रचलें; ईश्वरानें त्याचे तीन भाग करून तें त्रैलोक्यांत वांटून दिलें. खालीं फक्त 'राम' हीं दोन अक्षरें उरलीं. या अक्षरांचा–रामाचा–उच्चार केला असतां, भुक्ति व मुक्ति या प्राप्त होतात. त्या अक्षरांचा मृदु उच्चार करून वृत्ति तदाकार कराव्या आणि आपलें लक्ष अणुमात्र चळूं न देतां त्यांचा उच्चार केला असतां मनुष्याला आत्मसाक्षात्कार होतो."

अशा तऱ्हेनें सर्वांना नाममहिमा सांगून सिद्धारूढ पुढील प्रवासाला निघाला.

## अमोल ठेवा : ४

सिद्धारूढस्वामी एकदां मंगलगिरीहून येत असतां त्यांनीं एका गुहेंत एक ब्राह्मण वसलेला पाहिला. त्याचें नांव सोमेश्वर असें होतें. तो अघोर विद्येचा अभ्यास करीत होता. स्वामी त्याला म्हणाले, " अरे, तूं ब्राह्मण आहेस. तुझ्याजवळ अमोल असा ठेवा असतांना तूं या भलत्याच फंदांत कशाला लक्ष घालतोस? ब्राह्मणानें पुण्यकर्मं केलीं असतां त्या कर्मांच्या जोरावर महान् सिद्धि प्राप्त होत असतात; तरी ही अघोरी विद्या तूं आजपासून सोडून दे ! "

आपणाला योग्य असें मार्गदर्शन झालें नाहीं यामुळें आपण भलत्याच मार्गाला लागलों असें वाटून त्या ब्राह्मणाला पश्चात्ताप झाला आणि तो स्वामींना म्हणाला, " मला गुरूनें या विद्येच्या अनिष्ट परिणामाबद्दल कांहींच सांगितलें नाहीं. आतां मी काय करावें तें कृपा करून सांगा. "

स्वामी म्हणाले, " तूं रोज चोवीस हजार गायत्रीमंत्राचा जप करीत जा. त्याच्यायोगानें चित्तशुद्धि होऊन तुला स्वरूपानन्द प्राप्त होईल. "

हें ऐकून त्या ब्राह्मणानें क्षुद्रविद्येचा त्याग केला आणि तो सत्प्रवृत्त बनला.

एकदां एका शिष्यानें स्वामींना प्रश्न केला, " आपण आपल्या देहाला ' मी ' म्हणून संबोधतों. देह हा कांहीं आत्मा नव्हे; तर मग आत्मा कोणाला म्हणावें हें सांगा. "

सिद्धारूढ म्हणाले, "हें शरीर धातुमय आहे व जो हीं तत्त्वें पृथक्त्वानें पहातो तो आत्मा होय. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश यांवरच सर्व शरिराचे व्यापार चालतात म्हणून परमात्म्यानें प्रत्येकाचे दोन भाग केले. एक एक भाग स्वतःकडे ठेवला. उरलेल्याचे चार भाग करून एक एक इतर भूतांना दिला. नंतर प्रत्येकाचे पादांश घेतां पंचवीस तत्त्वें झालीं आणि तीं एकत्र केलीं असतां देह झाला. पण तो चलनरहित

असा होता. म्हणून तो आपल्यावांचून हालणार नाहींत हें जाणून कपाळाचा भेद करून त्यानें जीवरूपानें शरिरांत प्रवेश केला. शरिराचा अभिमान धरला व स्थूल भोग भोगले. तो संस्कारयुक्त झाला, तोच स्वप्नांत सूक्ष्म भोग रचीत असतो. त्यांचा सूक्ष्म देहानें म्हणजे लिंगदेहानें भोग घेऊन लय पावल्यावर सुषुप्तींत जाऊन आनंदमय होतो. देहांतील काठिण भाग पृथ्वी, द्रवपदार्थ म्हणजे जल, सर्व तेजांश म्हणजेच उष्णता, चलनवलन हा वायूचा अंश आणि पोकळी म्हणजे आकाश होय. असा तत्वांचा आणि देहाचा संबंध असून परमात्मा यांहून भिन्न आहे. ”

हें ऐकून शिष्य म्हणाला, “महाराज तुम्ही देह आणि परमात्मा यांसंबंधी विवरण केलें तें ऐकून मी चैतन्याहून वेगळा असल्याचें मला ज्ञान झालें असून आतां मी कृतार्थ झालों आहें.” असें म्हणून तो शिष्य स्वामींना नमस्कार करून निघून गेला.

एके दिवशीं अठरापगड जातीचे लोक “ कोणता धर्म श्रेष्ठ आहे ” म्हणून आपआपसांत भांडत होतें. त्यांचें भांडण ऐकून सिद्ध त्यांना म्हणाले, “ बाबानों, असल्या गोष्टींत रिकामा काथ्याकूट काय करीत बसलांत ? वस्तुतः परमेश्वर एकच आहे. फक्त त्याच्याकडे जाण्याचे मार्ग काय ते भिन्न आहेत. आपल्याला एखाद्या गांवीं जावयाचें झाल्यास आपण निरनिराळ्या मार्गांनीं तेथें जाऊं शकतों. मग त्या मार्गाबद्दल कलह करण्यांत काय अर्थ आहे ? तेव्हां तुम्हीं आपल्या अंतःकरणांत ज्ञानबीज पेरा. त्याला अंकुर आल्यावर सद्वर्तनाच्या कुंपणानें त्याचें रक्षण करा; भक्तियुक्त जलानें आणि कर्माच्या खतानें त्याची जोपासना करा; आत्म्याच्या ध्यानानें त्याचें पोषण करा म्हणजे तुम्हांला उत्तम गति प्राप्त होईल, आणि संसारांतील सर्व विपत्तींचा नाश होईल. उगाच या अशाश्वत मोहाच्या नादीं लागूं नका. सर्व धर्म श्रेष्ठच आहेत. तेव्हां त्या बाबतींत विनाकारण वाद घालण्यांत मतलब तो कोणता ? ”

एकदां जंगम या जातीचा एक हठयोगी कायमचें शीर्षासन घालून, खालीं डोकें वर पाय करून कालक्रमणा करीत होता. एक हजार जंगमांना भोजन घातल्याशिवाय पाय खालीं करायचे नाहींत असा त्यानें निश्चय केला होता. यामुळें गांवकरी अत्यंत काळजींत होते. सिद्धांना ही हकीगत समजली तेव्हां ते त्या जंगमाकडे गेले आणि एक हजार जंगमांना जेवायला घालण्याचें त्यांनीं त्याला आश्वासन दिलें. नंतर एकान्तीं त्याला नेऊन उपदेश केला. सिद्ध म्हणाले, " सर्व जग जंगमांनीं भरलेलें आहे. तूं कोणत्या जंगमाला जेवायला घालणार आहेस? जर तूं कांहीं लोकांनाच जंगम समजत असशील आणि ते षड्रिपुयुक्त असतील, तर तूं त्यांना पूज्य काय म्हणून मानणार? तसेंच ते जर षड्रिपुरहित असतील तर ते नित्य तृप्तच असतील, मग त्यांना भोजन कशासाठीं द्यावयाचें? "

हे सिद्धांचे तात्त्विक बोल ऐकून तो योगी निरुत्तर झाला. मग सिद्ध त्याला म्हणाले, " आतां तूं हें आपलें दांभिक वर्तन सोडून दे. लोकांना जर तुझा दांभिकपणा समजला तर तुझी अपकीर्ति होईल. "

मग त्या योग्याला दूधसाखर देऊन सिद्ध पुन्हा म्हणाले, " तूं जंगम आहेस. तुझा आत्मा आणि सर्व जंगमांचा आत्मा एक आहे. दूधसाखर घेऊन तुझा आत्मा तृप्त झाल्यामुळें अखिल जगांतील सर्व जंगमांचे आत्मे तृप्त झाले आहेत. आतां जंगमांचें सहस्रभोजन घालण्याची गरज उरली नाहीं. "

सिद्धांनीं सांगितलेलीं तत्त्वें त्या हठयोग्याला पटलीं; त्याचा भ्रमनिरास होऊन त्याच्या मनाला समाधान झालें आणि एक हजार जंगमांना जेवण देण्याचा त्याचा संकल्प पार मावळून गेला.

एकदां एक बालक विरक्त झाला आणि आपल्याला सन्मार्ग दाखविणारा गुरु मिळावा म्हणून तो सिद्धारूढ स्वामींकडे आला. त्यानें आपल्यावर अनुग्रह करण्याबद्दल स्वामींची प्रार्थना केली. त्याचा निर्धार किती आहे हें पाहण्यासाठीं सिद्धांनीं प्रथम त्याच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; पण

९०८५८

त्याचा निर्धार पक्का असल्यामुळें जास्त कांहीं न बोलतां तो सिद्धांची सेवा करूं लागला. त्याची गुरुभक्ति किती आहे हें पाहण्यासाठीं सिद्ध त्याला कधीं कधीं उपाशी ठेवीत. परंतु त्यानें कधींहि त्याबद्दल कुरकूर न करतां आपल्या सेवेंत अंतर पडूं दिलें नाहीं. तो तितक्याच नेटानें आणि सद्भावनेनें सेवा करीतच राहिला. त्याचें स्थैर्य पाहून सिद्धांनीं त्याचें नांव कबीर असें ठेवलें.

एकदां सिद्धांनीं त्याला जवळ बोलावलें व त्याला बसावयास सांगितलें. त्यानें आपलें मस्तक सिद्धांच्या चरणांवर ठेवून तो उठला आणि बाजूला जाऊन उभा राहिला. त्याची दृढता पाहण्यासाठीं सिद्ध त्याला म्हणाले, " ज्ञानसाध्य मोक्षासाठीं विवेक असला म्हणजे जास्त कांहीं करण्याची जरूर नाहीं. "

कबीरदास म्हणाला, " वैराग्याशिवाय विवेक कसा साध्य होणार ? "

यावर सिद्ध म्हणाले, " तर मग वैराग्य व विवेक या दोन गोष्टीच पुऱ्या आहेत. "

यावर पुन्हां कबीर म्हणाला, " शम, दम आणि तितिक्षा इत्यादि साधनांशिवाय वैराग्य टिकणार नाहीं. इंद्रियनिग्रहानें मनोजय साधतो. म्हणून या सर्व गोष्टी एकमेकांवर अवलंबून असल्यामुळें त्या सर्वांचीच गरज आहे. "

नंतर सदगुरूंनीं मनांत विचार केला कीं, कबीर बोलतो त्याप्रमाणें तो चालतो कीं नाहीं हें पाहावें; म्हणून ते त्याला म्हणाले, " कबिरा, सूज्ञांनीं या गोष्टी सोडून द्याव्यात; कारण त्यांत मरणप्राय वेदना होतात. तुला मी एखादा दुसरा सुखाचा मार्ग दाखवीन. कांहीं शास्त्रांत वश्य-आकर्षणादि बऱ्याच सिद्धि सांगितल्या आहेत. तूं माझा प्रिय शिष्य असल्यानें त्यांची माहिती मी तुला देईन. तूं त्यांचा अभ्यास करशील तर तुझ्या जीवाला शांति मिळेल व तुझा उदरनिर्वाहहि उत्तम रीतीनें चालेल. "

पण कबीर साधाभोळा नव्हता. त्यानें स्वामींना उत्तर दिलें, " गुरुवर्य,

आपण सांगतां तीं सुखें या लोकांतच मिळतात; पण पुढें तीं नरकयातना भोगण्यासच कारणीभूत होतात. म्हणून मी त्या गोष्टी त्याज्य समजतो. ''

नंतर सिद्ध त्याला म्हणाले, " तर मग परमसुखासाठीं उपासना किंवा योगसाधन कर. "

पुन्हां कबीर म्हणाला, " श्रुति सांगतात कीं, सत्कर्मापासून निर्माण झालेलें पुण्य खलास झालें कीं मनुष्याचें स्वर्गलोकांतून अधःपतन होतें. म्हणून मला तेहि उपाय आवडत नाहींत. मी या लोकीं जर विषयांच्या मागें लागलों तर तें दुःखालाच कारणीभूत होईल. ''

मग मात्र सिद्धांनीं विचार केला कीं, हा योग्य असा ज्ञानाधिकारी आहे. अंतर्बाह्य कर्मांचा त्याग करूनच हा येथें आलेला दिसतो. सिद्धांनीं त्याला येण्याचें कारण विचारलें. तो म्हणाला, '' आपल्या भाषणानें माझें समाधान झालें आहे. आतां फक्त एकच गोष्ट आपणास विचारतों. ईशावास्योपनिषद् हें कर्मपर आहे किंवा ज्ञानपर आहे याविषयीं मला शंका आहे. तरी त्या शंकेचें आपणांकडून निवारण व्हावें एवढीच माझी इच्छा आहे. "

सिद्धांनीं ईशावास्योपनिषदाचा ज्ञानपर अर्थ सांगून कविराचें समाधान केलें.

अखेरीस कबीर सिद्धांना म्हणाला, " गुरुजी, माझ्या पूर्वपुण्याईमुळेंच आपण मला भेटलांत. आज मी धन्य झालों आहें आणि म्हणूनच आपल्या कीर्तीचें समग्र वर्णन करून तें तुम्हांला गुरुदक्षिणा म्हणून अर्पण करीन. त्याच्या योगानें सर्व लोकांचा उद्धार होईल. तेव्हां असें वर्णन करण्याची आपली मला आज्ञा व्हावी. "

सिद्धांनीं त्याला तशी आज्ञा देऊन त्याची इच्छा पुरी केली आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणें कविरानें या चरित्राचा पूर्वार्ध कानडी भाषेंत रचला. मग सिद्धारूढ हुबळींतच राहिले.

* * *

## भक्तसंकटनिवारण : ५

हरिहर या नांवाचा एक विद्वान् पण अत्यंत दरिद्री ब्राह्मण कुमठा या गांवांत राहत असे. त्याच्या पत्नीचें नांव सरस्वती असें होतें. हें दांपत्य अतिशय प्रेमळ होतें. उभयतांचें श्रीकृष्णावर फार प्रेम असें. यामुळें ते त्याच्या भजन-पूजनांत नित्य रंगून गेलेले असत. त्यांना दारिद्र्यानें गांजलें होतें, यामुळें संसारांत तीं अगदीं विरक्त झालीं होतीं. त्यांनीं हुबळींत राहणाऱ्या सिद्धारूढस्वामींची कीर्ति ऐकली होती. तेच आतां आपणाला संसाराच्या उपाधींतून मुक्त करतील असें वाटून ते हुबळींत येऊन दाखल झाले. त्यांनीं स्वामींकडे जाऊन त्यांचें दर्शन घेतलें. दर्शनानें त्यांना अपरिमित समाधान झालें. ते स्वामींना म्हणाले, "आम्हांला या संसारजंजाळांतून सोडविणारा दुसरा कोणी दिसत नाहीं. आजपर्यंतच्या अनुभवावरून हा संसार अत्यंत दुःखमय वाटतो. त्यांतून तरणोपाय कांहींच दिसत नाहीं; म्हणून आम्ही आपणांस शरण आलों आहोंत. तरी आमच्यावर कृपा करून आम्हांला सन्मार्ग दाखवा."

हे बोल ऐकून सिद्धांना त्यांची दया आली व त्यांना 'भिऊं नका' असें आश्वासन दिलें. तेव्हांपासून त्या उभयतां पतिपत्नींनीं देहाभिमान सोडला आणि ते स्वामींची मनोभावें सेवा करूं लागले. स्वामींच्या तोंडून बाहेर पडलेलीं वेदान्ततत्त्वें ऐकून त्यांच्या चित्ताला स्थिरता आली. ते भिक्षा मागूनच आपला उदरनिर्वाह समाधानानें करीत असत.

सुमारें एक वर्षानंतर हरिहर दांपत्याला कुमठ्याला कांहीं जरुरीच्या कामासाठीं जाणें भाग पडलें. सिद्धांचा विरह होणार म्हणून ते अत्यंत कष्टी झाले. ते स्वामींना म्हणाले, "महाराज, आपली भेट व्हावी म्हणून आपण आम्हांला येथें लवकर आणावें."

स्वामी त्यांना म्हणाले, " तुम्ही कांहीं चिंता करूं नका. अखंड नामस्मरण मात्र करीत जा. वाटेंत कांहीं भय वाटलेंच तर मी सदैव तुमच्या पाठीशीं आहेच. "

असा प्रेमाचा निरोप घेऊन तें दांपत्य कुमठ्यास जाण्यासाठीं निघालें. वाटेनें जातां जातां त्यांना घनदाट अरण्य लागलें. मार्ग चालून जात असतां उभयतां भजन करीत होतीं. त्या नादांत हरिहराची पत्नी पुढें गेली आणि हरिहर मागें राहिला. तेव्हां एक भयंकर वाघ आकस्मात् समोरच्या झाडींतून येऊन सरस्वतीच्या समोर उभा राहिला. त्याला पाहून तर तिची गाळणच उडाली. वाघ तिच्यावर झडप घालणार इतक्यांत तिला गुरुवचनाची आठवण झाली व तिनें स्वामींचा धांवा करण्यास सुरुवात केली. तत्क्षणींच सिद्धारूढ त्या ठिकाणीं प्रकट झाले आणि सरस्वतीला म्हणाले, " भिऊं नकोस. " वाघालाहि त्यांनीं थांबण्याची आज्ञा दिली. तत्क्षणींच वाघ जमिनीवर शांतपणें पडून राहिला. इतक्यांत हरिहरहि तेथें आला. त्याला सरस्वतीजवळ स्वामी उभे असलेले दिसले आणि भीषण वाघ जमिनीवर स्वस्थ पडून राहिलेला आढळला. हरिहराला त्या प्रसंगाचा उलगडा होईना. त्यानें स्वामींना विचारलें, " महाराज आम्ही आपली आज्ञा घेऊन निघालों आणि तुम्ही येथें आमच्यापुढें केव्हां आलांत ? "

स्वामी म्हणाले, " तुम्हांला मीं वचन दिलें होतें कीं, मी सदैव तुमच्या जवळ असेन. माझे जेथे भक्त असतात व जे माझें अखंड स्मरण करतात त्यांची काळजी मी नेहमींच बाळगीत असतों. मी येथें असल्यावर तुम्हांला वाघाची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. "

असें म्हणून ते वाघाजवळ गेले, त्याच्या पाठीवरून त्यांनीं हात फिरविला तेव्हां तो वाघ एखाद्या पाळीव कुत्र्याप्रमाणें स्तब्ध राहिला. हरिहर व सरस्वती मोठ्या कौतुकानें हा प्रकार पहात होतीं. नंतर सिद्ध वाघाच्या कानांत कांहीं तरी हळूच कुजबुजले. त्याबरोबर वाघ उठला व शांतपणें रानांत निघून गेला.

नंतर पुन्हां एकदां सिद्धांनीं त्या दांपत्यास उपदेश केला आणि थोडें अंतर चालून गेल्यावर ते अंतर्धान पावले.

हरिहर आणि सरस्वती पुढें योग्य वेळीं कुमठ्यास जाऊन पोहोंचलीं. तेथील आपलें काम उरकून पुन्हां तीं हुबळीला जावयास निघालीं. कुमठ्यास जातांना ज्या रानांत त्यांना वाघ भेटला होता त्या रानांत आल्यावर पुन्हां तोच वाघ त्यांना आढळला. त्यांनीं पूर्ववत् सद्गुरूंचा धांवा केला; परंतु तो वाघ पूर्वींप्रमाणें भीषण दिसला नाहीं. तो एखाद्या माणसाळलेल्या जनावराप्रमाणें त्यांच्यासमोर आला आणि त्यांच्याबरोबर थोडा वेळ चालून शांतपणानें तो आपल्या मार्गानें रानांत निघून गेला. वाघाच्या अंगीं इतकी शांतता असलेली पाहून हरिहराला आणि त्याच्या पत्नीला मोठें नवल वाटलें. वाटेनें जातां जातां हरिहर आणि सरस्वती सिद्धांच्या सामर्थ्याचें कौतुक करीत होतीं. तीं अखेरीस हुबळीस येऊन पोहोंचलीं. स्वामींच्या मठांत जाऊन त्यांनीं सिद्धांचे पाय धरले. वाघासारख्या क्रूर श्वापदापासून स्वामींनीं आपलें रक्षण केल्याबद्दल त्यांनीं स्वामींना धन्यवाद दिला. सिद्ध म्हणाले, "गुरुभाव हा नेहमीं तारक असतो. भक्तांचीं संकटें निवारण्याचें सामर्थ्य गुरूच्या अंगी असतें."

पुढें हरिहर व त्याची पत्नी हीं उभयतां हुबळी येथेंच सुखानें राहिलीं.

सिद्धाश्रमांत रोजच्या रोज सिद्धांचे अनेक भक्त त्यांना अर्पण करण्यासाठीं नैवेद्य घेऊन येत असत. त्यांना अर्पण करून झाल्यावर जे पदार्थ उरले असतील ते सिद्धांचा प्रसाद म्हणून सर्वजण भक्षण करीत असत. एकदां सिद्धांचें भोजन झाल्यावर ते विश्रांति घेण्यासाठीं गेले आणि सर्व मंडळी त्यांचा प्रसाद घेऊन तलावाजवळ असलेल्या झाडाच्या छायेला विश्रान्ति घेत पडली होती. त्यांचीं मुलें जवळच आसपास खेळत होतीं. एका मुलानें चार हात लांबीचा एक मोठा नाग जवळ स्वस्थ पडून राहिलेला पाहिला. तो मुलगा अगदीं त्या नागाच्या जवळ गेला आणि

त्यानें त्याला दगड मारला. यामुळें तो नाग खवळून जोरानें फूत्कार टाकीत मुलाच्या अंगावर धांवून आला व त्यानें आपल्या शेपटीनें मुलाच्या पायाला जोरांत विळखा घातला आणि पाय जखडून टाकला. मुलानें सुटण्यासाठीं बरीच धडपड केली; पण नागानें पायाला घातलेला विळखा सुटला नाहीं इतकेंच नव्हे तर त्या नागानें मुलाच्या अंगाचा कडकडून चावा घेतला; तेव्हां तो मुलगा मोठमोठ्यानें रडूं लागला. मुलगा कां रडतो हें पाहण्यासाठीं त्याची आई धांवून गेली. आपल्या मुलाला सापानें धरलें आहे असें पाहतांच तिच्या सर्व अंगाला कंप सुटला. मुलाची आणि पत्नीची अवस्था पाहून त्या मुलाच्या बापालाहि काय करावें हें सुचेना. तोहि घाबरून गेला. शेवटीं आपल्या मुलाचे प्राण जाणार हें पाहून तो आपल्या पत्नीला म्हणाला, " आतां शोक करून काय उपयोग ? "

मुलगा ओरडत आहे हें ऐकूनहि नागाच्या भीतीनें कोणीच त्याच्याकडे जाण्यास धजेना. इतक्यांत ही बातमी कोणी तरी सिद्धांना सांगितली. सिद्ध तत्काळ त्या मुलाजवळ आले. त्यांनीं सापाला धरून बाजूला केलें. नाग निश्चेष्ट पडून राहिला. सिद्धांनीं मुलाच्या अंगावरून प्रेमानें आपला हात फिरविला आणि त्याला ते मठांत घेऊन गेले. तेव्हां मुलाचे आईबाप म्हणाले, " आम्ही मुलाला उगीच ' माझा ' ' माझा ' असें म्हणतों; पण प्रसंग आला तर सद्गुरूच संकटांतून वांचविण्यासाठीं धावून येतात. "

मुलाला मठांत आणल्यावर सिद्धांनीं त्याच्या सर्व अंगाला विभूति लावली. मुलगा सिद्धांच्या कृपेनें सर्पदंशापासून वांचला.

❖ ❖ ❖

## अभिमानाचें निराकरण : ६

हुबळी शहरांत रमानाथ या नांवाचा एक ब्राह्मण राहत असे. त्याच्या पत्नीचें नांव कृष्णाबाई असें होतें. त्यांच्या मुलाच्या मुंजीची तयारी चालू असतांना कृष्णाबाई आपल्या पतीला म्हणाली कीं, "आपल्या मुलाच्या मुंजीच्या अगोदर श्रीसिद्धारूढस्वामींना बोलावून त्यांची पूजा करावी आणि मगच मुलाचा उपनयनसंस्कार करावा; कारण या मुलाच्या अगोदरचीं आपलीं दोन्ही अपत्यें जगलीं नाहींत. या मुलाच्या वेळींहि माझ्या मनांत धास्ती वाटत होती. त्या वेळीं मला कोणी तरी सांगितलें कीं, सिद्धारूढांच्या अनुग्रहानें तुझीं मुलें वांचतील. म्हणून या मुलाच्या जन्मापूर्वींच मी सिद्धांच्या मठांत गेले व त्यांना प्रार्थना केली कीं, माझा मुलगा तुम्हीं वांचविला तर त्याच्या मुंजीच्या अगोदर मी आपणांला माझ्या घरीं नेऊन आपली पूजा करीन व आपल्याला चांगलीं वस्त्रें व अलंकार अर्पण करीन; तरी माझे मनोरथ पूर्ण करावे."

कृष्णाबाई पुढें म्हणाली, "त्या दयाळू सिद्धांनीं मला आशीर्वाद दिला आणि त्यांच्याच कृपेनें हा मुलगा वांचला. म्हणून माझा नवस फेडण्यासाठीं स्वामींच्या मठांत जाऊन त्यांची भक्तिभावानें पूजा करावी, त्यांना आपल्या घरीं आणावें आणि त्यांना सोन्याचीं नाणीं देऊन त्यांचा योग्य प्रकारें आदरसत्कार करावा."

पत्नीचें हें भाषण ऐकून रमानाथ संतापले व ते तिला म्हणाले, "तुला नवस करायला देव कमी पडले का ? या स्वामीला—शूद्राला— नवस करण्याचें काय कारण होतें ? या शूद्राला मीं जर घरीं आणलें तर इतर ब्राह्मण माझी चांगलीच खरडपट्टी काढतील. तेव्हां असला मूर्खपणा करायला मला तूं सांगूं नकोस !"

नवऱ्याचे हे उद्गार ऐकून कृष्णाबाईला फार खेद झाला, आणि तिच्या

मनाला मोठाच धक्का बसला. तिच्या मनांत विचार आला कीं, “ मुलगा वांचावा म्हणून मीं स्वामींना नवस केला आणि तो फेडला नाहीं तर आपला मुलगा वांचणार नाहीं ! ”

या विचारानें तिचें मन अस्वस्थ झालें. स्वामींची मूर्ति मनांत आणून ती म्हणाली, “ आतां माझा मुलगा वांचेल असें मला वाटत नाहीं, कारण माझे पति नवस फेडायला तयार नाहींत; तेव्हां स्वामी महाराज तुम्हींच आतां माझ्या मुलाचें रक्षण करा ! ”

कृष्णाबाई स्वामींच्या मूर्तीचें ध्यान करीत होत्या हें वर सांगितलेंच आहे. त्या मूर्तीनेंच कृष्णाबाईला घाबरूं नकोस असें आश्वासन दिलें.

मुंजीच्या अगोदर एकदां रमानाथ देवघरांत देवांची पूजा करावयास बसले असतांना एक विलक्षण गोष्ट घडून आली. देवांत ज्या ठिकाणीं कृष्णाची मूर्ति होती त्या ठिकाणीं रमानाथाला सिद्धारूढांची प्रतिमा दिसूं लागली. प्रथम रमानाथांना वाटलें कीं, आपल्याला बुद्धिभ्रंश झाला असावा म्हणून स्वामींची प्रतिमा दिसत आहे. लगेच त्यांना शंका आली कीं, हें आपल्या पत्नीचेंच काम आहे. म्हणून त्यांनीं कृष्णाबाईला हांक मारली आणि तिला विचारलें कीं, “ तूं कृष्णाची मूर्ति काढून तिच्या ठिकाणीं सिद्धारूढांची प्रतिमा कशाला ठेवलीस ? ”

या प्रश्नाला कृष्णाबाईनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिला मनांतल्या मनांत आनंद झाला. आपण सिद्धांचें ध्यान करून मुलाच्या रक्षणाबद्दल प्रार्थना केली तिचा हा प्रभाव असावा अशी तिची खात्री झाली. रमानाथांनीं पुन्हां एकदां सर्व देव पाहिले तेव्हां त्यांना सर्व देवांच्या ठिकाणीं सिद्धारूढांच्या प्रतिमा दिसूं लागल्या. मग मात्र रमानाथ चपापले आणि ते कृष्णाबाईला म्हणाले, “ मी तुझ्यावर विनाकारणच रागावलों. देवांच्या बाबतींत जो आश्चर्यकारक प्रकार दिसून आला तो स्वामींनींच निर्माण केलेली माया असली पाहिजे यांत शंका नाहीं. आतां मी तुझ्या म्हणण्या-

प्रमाणें मठांत जाऊन स्वामींची योग्य प्रकारें पूजा करीन. खरोखर मी तुझ्यावर विनाकारण रागावलों. ”

असें म्हणून त्यांनीं देव्हाऱ्यांत घडून आलेला चमत्कार सर्व मंडळींना प्रत्यक्ष दाखविला. नंतर सिद्धांच्या आश्रमांत जाऊन मोठ्या आदरानें त्यांना रमानाथांनीं आपल्या घरीं आणलें आणि त्यांची मनोभावें पूजा केली. त्यांना ओवाळलें. दक्षिणा आणि शेला अर्पण केला. नंतर त्यांना उत्तम रथांत बसवून त्यांची त्यांच्या आश्रमांत रवानगी केली.

एकदां दोन कानडी संत पंढरपूरला जातांना हुबळी येथें उतरले. ते जातीनें ब्राह्मण होते. हुबळीच्या ब्रह्मवृंदानें त्यांचें योग्य आदरातिथ्य केलें. तेथील रामराया या नांवाच्या गृहस्थानें त्या निमित्तानें सर्व ब्राह्मणांना जेवण देण्याचें ठरविलें. भोजनासाठीं सिद्धारूढांनाहि बोलवावें असें त्याच्या मनांत होतें. त्याप्रमाणें त्यानें आपला मानस ब्रह्मवृंदापाशीं व्यक्त केला तेव्हां सर्व ब्राह्मण उपहासानें म्हणाले, “ आम्ही सिद्धारूढांना ओळखतों. तो जरी ब्रह्मनिष्ठ असला तरी तो जात्या शूद्र आहे; म्हणून तो आमच्या पंक्तीला बसूं शकत नाहीं. तो आमच्या पंक्तीला बसला तर आम्हांला कमीपणा येईल. ”

हे शब्द ऐकून रामरायाला फार वाईट वाटलें. त्यानें आपल्या मनांत स्वामींना प्रार्थना केली कीं, “ हे सिद्धनाथा, या ब्राह्मणांना सद्बुद्धि दे व त्यांच्यावर कृपा करून त्यांना भक्तिमार्गाला लावा. ” अशी प्रार्थना करून रामराया झोपीं गेले. त्यांच्या स्वप्नांत येऊन सिद्धारूढ म्हणाले, “ ऊठ आणि लवकर पूजा कर. ”

रामरायानें स्वप्नांतच पूजेचें आसन तयार केलें, त्याच्यावर सिद्धारूढांना बसविलें आणि त्यानें त्यांची षोडशोपचारें पूजा केली. पूजा झाल्यावर सिद्धारूढांनीं प्रसाद म्हणून एक नारळ रामरायांच्या हातांत दिला आणि ते म्हणाले, “ तुझी इच्छा पूर्ण होईल. ”

असें म्हणून ते अंतर्धान पावले. रामराया जागा झाला आणि पाहातो

तों तेथें सिद्धारूढ नाहींत आणि कांहींहि नाहीं. स्वप्नांतील सर्व देखावा नाहींसा झाला; परंतु त्याच्या हातांत मात्र सिद्धारूढांनीं प्रसादाचा दिलेला नारळ प्रत्यक्ष दिसला.

रामराया अगदीं पहांटेस जागा झाला होता. त्यानें भोजनाची सर्व तयारी करविली. दुपारीं सर्व ब्राह्मणमंडळी त्याच्या घरीं जेवायला आली. रामरायानें त्या कानडी संतांची पूजा केली आणि सर्वांना भोजन करण्यास सांगितलें. पाहुणे आलेले संत जवळजवळच जेवायला बसले होते. फक्त सिद्धारूढ न आल्यामुळें रामरायाला हुरहूर लागली होती; परंतु तत्क्षणींच दोन कानडी संतांच्यामध्यें सिद्धारूढ बसून जेवीत आहेत असें त्याला दिसलें तेव्हां तो चकित झाला.

सर्व लोकांचें लक्ष जेवणांत गुंतल्यामुळें सिद्धारूढांकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं; पण जेव्हां जेवण संपत आलें तेव्हां त्या कानडी संतांचें लक्ष सिद्धारूढांकडे गेलें. मग ते म्हणाले, " आम्ही जेवायला बसलों त्या वेळीं येथें कोणीच नव्हतें आणि हे सिद्धारूढ केव्हां आले हेंहि आम्हांला समजलें नाहीं."

सिद्धारूढ पंक्तींत जेवत असतांना कोणी तरी त्यांच्या मठांत जाऊन पाहिलें तेव्हां सिद्धारूढ मठांतच असलेले त्याला दिसले. आपण पंक्तींत असल्याचा देखावा दाखवून सिद्धारूढ एकदम गुप्त झाले. ते कानडी संत म्हणाले, " केवळ रामरायाच्या उत्कट भक्तीमुळेंच सिद्धांनीं आम्हांला दर्शन दिलें; पण त्यांची पूजा करण्याचा लाभ आम्हांला घडला नाहीं. तरी त्यांना येथें आणलें तर आम्हीं धन्य होऊं."

मग रामराया सिद्धांना बोलावण्यासाठीं सिद्धाश्रमांत गेला आणि त्यांना म्हणाला, " महाराज, तुम्ही प्रत्यक्ष ईश्वर आहांत. तुम्हीं दृष्टान्त दिल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या."

हें ऐकून सिद्धारूढ नुसतेच हंसले. मग रामरायानें त्यांना आपल्या घरीं आणलें आणि सर्व मंडळींनीं त्यांची भक्तिपूर्वक पूजा केली.

* * *

# सिद्धांच्या कृपेनें कल्याण : ७

हुबळींत बसवण्णा नांवाचा एक गृहस्थ रहात असे. त्याच्या पत्नीचें नांव गुरुव्वा होतें. त्याला दोन मुलगे आणि दोन मुली होत्या. तें कुटुंब अत्यंत दरिद्री होतें. बसवण्णाची नोकरी गेली होती आणि प्रयत्न करूनहि दुसरी नोकरी मिळाली नव्हती. तशांतच त्या वेळीं दुष्काळ पडला. घरांत जें कांहीं थोडें किडुकमिडुक होतें तें विकून कसेबसे दोनतीन दिवस त्यांनीं घालविले. नंतर एक दिवस असा आला कीं, त्यांच्या घरांत एक दिडकी अगर धान्याचा कणहि उरला नव्हता. बसवण्णा सर्व गांवांत हिंडला. त्यानें पुष्कळ माणसांजवळ धान्याची याचना केली; पण त्याला कोणी मूठभरहि धान्य दिलें नाहीं. तो निराश होऊन दुःखित अंतःकरणानें घरीं आला. आपल्यासाठीं बापानें कांहीं तरी खायला आणलें असेल अशा आशेनें मुलें त्याच्याकडे धांवून गेलीं; पण भुकेलेल्या मुलांना द्यायला कांहीं नाहीं हें मनांत येऊन त्याला फार दुःख झालें. आजपर्यंत त्याला भीक मागण्याचा प्रसंग आला नव्हता. दोन दिवस कोणालाच अन्न मिळालें नाहीं. अन्नावांचून सर्वजण भुकेनें व्याकूळ झाले होते. तिसऱ्या दिवशीं तर दुःखाचा कडेलोट झाला. बसवण्णाचा एक मुलगा आणि एक मुलगी अन्न अन्न म्हणून भुकेला बळी पडली. बसवण्णा आणि त्याची पत्नी यांच्यावर त्या अपत्यांच्या मृत्यूनें दुःखाचा डोंगरच कोसळला. मुलांचा अंत्यविधि उरकण्यासाठीं बसवण्णा गेल्यावर त्याचीं राहिलेलीं दोन अपत्यें भुकेनें व्याकूळ होऊन निश्चेष्ट झोंपलीं होतीं. बसवण्णाच्या पत्नीला दुःखामुळें भ्रम झाला होता आणि त्या भ्रमांत ती एका विहिरीच्या कांठावर जाऊन बसली होती. बसवण्णा मृत अपत्यांचा अंत्यविधि उरकून परत घरीं आल्यावर त्याला त्याची गुरुव्वा कोठें दिसेना. मुलें झोंपेंतून जागीं होऊन रडत बसलीं होतीं. त्यांना बरोबर घेऊन बसवण्णा

पत्नीच्या शोधार्थ निघाला. तेव्हां ती एका विहिरीच्या कांठावर बसलेली दिसली. त्याच वेळीं एका साधूनें तिला विहिरीच्या कांठावरून मागें ओढून घेतली. अत्यंत दुःखावेगानें तिला मूर्च्छा आली होती. बसवण्णा तिच्याजवळ गेला तेव्हां ती मृतप्राय पडून राहिलेली दिसली. साधूनें तिच्यावर कृपादृष्टि टाकतांच ती शुद्धींत येऊन उठून बसली व मृत मुलांची आठवण करून आक्रोश करूं लागली. ती म्हणाली, "माझ्या दोन मुलांनीं 'अन्न अन्न' म्हणून प्राण सोडला; आणि आतां राहिलेलीं दोन मुलेंहि अन्नावांचून मृत्युपंथाला लागलीं. मला आतां दुःख सहन होत नाहीं. देवा रे आतां मी काय करूं?"

असें म्हणून ती त्या दुःखाच्या भरांत जीव द्यायला उठली. तेव्हां त्या साधूनें तिच्या कपाळाला आपल्या बोटानें स्पर्श केला. त्याबरोबर ती आपलें सर्व दुःख विसरली. पतीनें तिला उठवून घराकडे नेलें. साधूलाहि त्यांनीं आपल्या घरीं नेलें, आणि त्यांना बसवण्णानें आसनावर बसविलें. सर्वांनीं त्यांना भक्तिभावानें नमस्कार केला. बसवण्णा म्हणाला, "महाराज, आपलें पूजन करावें अशी फार इच्छा होती; पण घरांत पूजेचें साहित्य मुळींच नाहीं, यामुळें माझा निरुपाय आहे. तरी आपली आमच्यावर कृपा-दृष्टि असावी एवढेंच आपल्या चरणांपाशीं मागणें आहे. आपले मजवर फार उपकार आहेत."

साधु म्हणाला, "मला फार भूक लागली आहे. कांहीं तरी खायला दे."

बसवण्णाच्या घरीं अठरा विश्वे दारिद्र्य. त्याला आणि त्याच्या बायको-मुलांनाच खाण्याची पंचाईत! तो बिचारा त्या साधूला खायला काय देणार? बसवण्णाला आपल्या परिस्थितीबद्दल फार खेद झाला आणि डोळ्यांत अश्रू आणून त्यानें आपली परिस्थिति त्या साधूला निवेदन केली. तेव्हां साधु म्हणाला, "तुझ्या पेटींत पैसे असतील ते पाहा आणि ते इकडे घेऊन ये."

नंतर बसवण्णानें आपली पेटी तपासून पाहिली तेव्हां त्याला एक पैसा सांपडला. तो घेऊन बसवण्णा साधूपाशीं आला आणि आपल्याला फक्त एकच पैसा सांपडल्याचें त्यानें साधूला सांगितलें. बसवण्णा म्हणाला, "या एका पैशांत तांदळाचे चार दाणे सुद्धां मिळणार नाहींत! परंतु आपण महात्मे आहांत म्हणून आपल्या शब्दावर विश्वास ठेवून बाजारांत जातों."

असें म्हणून त्यानें तो पैसा धोतराच्या पदरांत बांधला आणि तो बाजारांत गेला. तेथें दुकानांत जाऊन त्यानें आपल्या धोतराचा पदर सोडला, तेव्हां त्याला एका पैशाच्या जागीं सोन्याची एक मोहोर सांपडली. ती पाहून त्याला फार हर्ष झाला. त्यानें भोजनाचे सर्व पदार्थ खरेदी केले. त्यांची किंमत देऊन टाकली आणि बाकीची रक्कम घरीं आणली. आणलेले जिन्नस आणि परत आणलेले पैसे त्यानें साधूपुढें ठेवले. साधूनें ते सर्व पैसे गुरव्वाजवळ देऊन तिला स्वयंपाक करावयास सांगितलें. स्वयंपाक झाल्यावर साधु म्हणाला, "प्रथम मुलांना जेवायला घाल. नंतर मी बसवण्णासह जेवायला बसेन."

जेवण झाल्यावर बसवण्णाआदिकरून सर्वांनीं त्या साधूला नमस्कार केला. साधूनें, "कल्याण होईल," असा सर्वांना आशीर्वाद दिला व तो निघून गेला.

बसवण्णाला वाटलें कीं, हा साधु म्हणजे सिद्धारूढच असले पाहिजेत. गुरुव्वा म्हणाली, "आपण तर त्यांच्याकडे कधींच गेलों नाहीं; मग ते आपल्याला काय म्हणून साहाय्य करतील?"

असें ती म्हणाली तेव्हां बसवण्णानें सिद्धाश्रमांत जाण्याचा विचार केला आणि तीं उभयतां सिद्धाश्रमांत गेलीं. तेथें पाहतात तो त्यांची खात्री झाली कीं त्यांच्या घरीं जो साधु आला होता तेच हे सिद्धारूढ स्वामी. त्या पति-पत्नींनीं त्यांच्यापुढें लोटांगण घातलें. सिद्धांनीं त्यांना जवळ बोलावून

स्थळप्रत.

घेतलें व सांगितलें कीं, 'तुमच्याजवळ दहा रुपये आहेत ते घेऊन व्यापार करा.'

सिद्धांच्या वचनावर विश्वास ठेवून बसवण्णानें दहा रुपयांच्या भांडवलावर व्यापार केला. लवकरच तो श्रीमंत बनला. ते सर्व दररोज सिद्धांचें दर्शन घेत. सिद्धांच्या कृपेनें त्यांचें कल्याण झालें.

एकदां सिद्धारूढस्वामी कट्टयावर ध्यानस्थ बसले होते. सिद्धांचा मत्सर करणारे सहा उन्मत्त यवन त्यांना मारण्याच्या इच्छेनें त्या ठिकाणीं आले. त्यांपैकीं एकानें त्यांना ढकलून दिलें. सिद्ध आपला तोल सांवरून पुन्हां कट्टयावर बसले. मग ते यवन फारच खवळले आणि ते म्हणाले कीं, " आज कांहीं झालें तरी या खुळ्याला मद्य पाजलेंच पाहिजे ! "

असें म्हणून त्यांनीं सिद्धांना ओढून आपल्या मध्यें घेतलें. कोणीं त्यांना लाथा मारूं लागले, कोणी त्यांच्या डोळ्यांना टोचूं लागले, कोणी त्यांच्या डोक्यावर काठ्या मारीत होते. हा प्रकार चालला असतांना सिद्धारूढ अगदीं शांत होते. त्यांनीं हूं का चूं केलें नाहीं. स्वामी त्यांना म्हणाले, " तुम्ही आज फार मोठें कार्य करीत आहांत. असें महत्कार्य करणारे आजपर्यंत मला कोणीच भेटले नाहींत. तुमचे मजवर फार उपकार झाले आहेत. तरी सांगतों तें ऐका. गांवांतून आतां लवकरच कांहीं भक्त येतील. ते येथें आल्यावर तुम्हाला भयंकर मारहाण करतील आणि त्यांनीं तुम्हांला मारलें म्हणजे मला खरोखर फार वाईट वाटेल. म्हणून तुम्हांला येथून जितकें लवकर निघून जातां येईल तितके लवकर निघून जा व उद्यां याच वेळीं परत या. "

पण सिद्धांचे हे बोल त्या यवनांना खुळेपणाचे वाटले व सिद्धांचा पूर्णपणें घात करण्यासाठीं त्यांनीं एक मोठा धोंडा उचलला आणि तो स्वामींच्या अंगावर टाकणार इतक्यांत त्यांना जवळच माणसांचा गलबला ऐकूं आला. त्यांनीं घाबरून हातांतील धोंडा टाकून दिला आणि मुकाट्यानें ते बाजूला जाऊन उभे राहिले.

त्या वेळीं सिद्धांचे भक्तजन त्या ठिकाणीं आले व सर्वांनीं त्यांच्या-पुढें लोटांगण घातलें. नंतर ते सिद्धांना म्हणाले, " आज काळम्माचा रथोत्सव आहे. रथाला शृंगारून त्यांत काळम्माची मूर्ति ठेवून दिली व माणसें रथ ओढूं लागलीं असतांना तो कांहीं केल्या हालत नाहीं. तेव्हां एक गृहस्थ म्हणाला, ' एखाद्या महात्म्याला रथांत बसविल्याशिवाय रथ हालणार नाहीं. ' म्हणून आम्ही मुद्दाम तुमच्याकडे आलों आहोंत. तरी कृपा करून आपण येऊन रथांत बसावें. " सिद्धांनीं त्यांचें म्हणणें कबूल केलें.

हें सर्व संभाषण ते यवन दुरून ऐकत होते. ते म्हणाले, " हे लोक किती मूर्ख आहेत ! या वेड्याला महात्मा समजून रथावर बसण्यासाठीं काय घेऊन जात आहेत ! हा वेडा पीर रथांत बसला म्हणजे रथ हालेल ही किती वेडगळ कल्पना ! "

असें म्हणून ते यवन पुढें काय प्रकार घडतो तें पाहाण्यासाठीं त्या लोकांच्या मागोमाग रथाकडे गेले.

इकडे जुन्या हुबळी शहरांत रथ शृंगारून रस्त्यांत उभा करून ठेवला होता. शेंकडों लोक रथ ओढीत होते; पण तो आपली जागा यत्किंचितहि सोडीत नव्हता. मग एका सद्‌गृहस्थानें सिद्धांना एका कट्ट्यावर बसवून ठेवलें. तरी रथ हालेना. यवन म्हणाले, " हा जर महात्मा असता तर आम्हीं त्याला इतका त्रास दिल्यावर त्यानें आम्हांस केव्हांच शापलें असतें ! "

मग तेथील एका गृहस्थानें विचार केला कीं सिद्धांना रथांत बसविल्या-शिवाय रथ हालणार नाहीं. कांहीं लोकांना हा विचार मान्य झाला नाहीं. त्यांना वाटलें कीं सिद्धांना जर काळम्माजवळ बसविलें तर काळम्मा आपल्यावर कोपेल. म्हणून ते सिद्धांना रथांत काळम्माजवळ बसविण्याच्या विरुद्ध होते. इतक्यांत तेथें उपस्थित असलेला एक गृहस्थ म्हणाला, " काल माझ्या स्वप्नांत काळम्मा आली आणि म्हणाली कीं, उद्यां सकाळीं

सिद्धांना जर रथांत बसविलें नाहीं तर मी रथ चालूं देणार नाहीं. माझ्या मनांत या स्वप्नाविषयीं प्रथम संशय होता म्हणून त्याबद्दल मी कोणापाशीं बोललों नाहीं; पण रथ ज्या अर्थीं चालत नाहीं त्या अर्थीं माझें स्वप्न सत्य असावें असें मला वाटतें. तेव्हां सिद्धांना रथांत बसविण्यावांचून दुसरा उपाय नाहीं अशी माझ्या मनाला खात्री वाटते. तरी सिद्धांना रथांत बसविल्यानें काळम्मा कोपेल ही तुमची भीति व्यर्थ आहे."

त्या गृहस्थाचें हें म्हणणें सर्वांना पटलें आणि त्यांनीं सिद्धांना रथांत बसविलें. सुवासिनींनीं त्यांना ओवाळलें आणि लोकांनीं रथ सहज ओढल्या-बरोबर तो चालूं लागला. सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले आणि यवन तर अगदीं शरमलेच !

रथोत्सव संपला. सिद्ध आपल्या मठांत गेले. सिद्ध भक्तांना म्हणाले, "ही ईश्वरी माया आहे; यांत माझें असें कांहींच नाहीं."

इतक्यांत ते सहा यवन तेथें आले. त्यांना सिद्ध म्हणाले, "चला, आतांच तुमचें काम करून घ्या. कालचा दगड येथेंच पडला आहे. तुम्हांला आतां कोणालाहि भिण्याचें कारण नाहीं."

सिद्धमुनींचें हें भाषण ऐकून यवनांचें मन बदललें. सिद्धांना मारल्याचें त्यांना फार वाईट वाटलें आणि पश्चात्ताप झाला. त्यांनीं सिद्धांचे पाय धरले आणि ते म्हणाले, "तुम्हीं खरोखर महात्मे आहांत. आमच्या अज्ञाना-आपला अधिकार मुळें आम्हांला समजला नव्हता यामुळें आम्हीं मदांध होऊन आपला छळ केला. त्याबद्दल आम्हांला पश्चात्ताप झाला आहे. तरी कृपा करून आमच्या अपराधाची आम्हांला क्षमा करावी. आम्हीं आपणांला शरण आलों आहोंत."

तेव्हां सिद्धारूढ त्यांना म्हणाले, "तुम्हांला तुमची चूक कळून आली हें चांगलें झालें. तुम्ही दुर्गुण सोडून सद्गुण घेतलेत, आमचें काम झालें."

हें ऐकून सिद्धांना वंदन करून ते यवन आपआपल्या घरीं निघून गेले.

* * *

## भक्तांचें संकटनिवारण : ८

सिद्धाश्रमांत दरवर्षी श्रावण महिन्यांत आणि पुढें महाशिवरात्रीला भजन-कीर्तनाचा आठवडाभर उत्सव होत असे. उत्सवांत जमलेल्या लोकांचें जेवणखाण मठांतच होत असे. उत्सवासाठीं हजारों लोक जमत असत. मठाजवळ असलेल्या तलावांतून सर्व लोकांना पाण्याचा पुरवठा होत असे. एकदां पर्जन्याच्या अभावीं तलाव कोरडा पडला. महाशिवरात्रींचा सात दिवस उत्सव करावयाचा झाल्यास पाणी फार लांबून आणावें लागणार होतें आणि उत्सवासाठीं जमलेल्या हजारों लोकांना पाणी पुरविणें मोठ्या कष्टाचें आणि जिकिरीचें काम होतें.

सिद्ध आपल्या भक्तांना म्हणाले, " तलाव तर कोरडा पडला आहे. उत्सवाला फार लांबून पाणी आणावें लागेल आणि तुम्हांला भारी कष्ट पडतील; तेव्हां या वर्षी उत्सव करूं नका. उत्सवांत उत्साह लागतो आणि जिवापाड कष्ट केल्यानें तो उत्साह जर मावळला तर उत्सव करण्यांत अर्थ तो कोणता ? "

हें ऐकून सिद्धांची भक्तमंडळी खिन्न झाली. त्यांना असें वाटलें कीं, न जाणों कदाचित् आपल्या गुरुभक्तीची परीक्षा पाहण्यासाठीं सिद्ध ' उत्सव ' करूं नका असें म्हणाले असतील. इतक्यांत एक टवाळ मनुष्य म्हणाला, " सिद्धांना तुम्ही परमेश्वराचा अवतार समजतां तर मग त्यांना कोणती गोष्ट अशक्य आहे ? त्यांनीं जर मनांत आणलें तर पाऊस पडायलाच हवा आणि पाऊस पडला तरच त्यांनीं तुमच्या पूजेचा स्वीकार करावा. "

त्या टवाळ माणसाचे हे शब्द ऐकून सिद्धांचा भक्त तुकाप्पा संतापून त्याला म्हणाला, " मूर्खा, सिद्ध म्हणजे साक्षात् निर्गुण ब्रह्म आहेत. ते सर्वांचें अधिष्ठान आहेत. कितीहि संकटें आलीं तरी त्यांना निर्धारानें

तोंड दिलें पाहिजे. आपला निर्धार किती आहे हें पाहण्यासाठींच कदाचित् सिद्धांनीं उत्सव करूं नका म्हणून सांगितलें असलें पाहिजे. ”

नंतर सिद्धांचे सर्व भक्त एके ठिकाणीं जमले आणि सर्वांनुमतें उत्सव करण्याचें ठरलें आपल्याला कितीहि कष्ट पडले तरी उत्सवांत खंड पडूं द्यावयाचा नाहीं असा ठाम निश्चय करून ते सर्वजण सद्गुरूपाशीं गेले. तुकप्पाला सर्वांनीं आपला पुढारी नेमला. तुकप्पा सिद्धांना म्हणाला, “ सिद्धनाथ काल तुम्हीं उत्सव बंद ठेवण्याविषयीं दिलेली आज्ञा आम्हांला योग्य वाटत नाहीं. कारण उत्सव लोकोद्धारार्थ असतात आणि त्यायोगानें सर्व लोकांची सेवा करण्याचें पुण्य आमच्या पदरीं पडणार आहे. आम्हीं संसारी माणसें. अगोदरच आमच्या हातून घडावी तशी गुरुसेवा घडत नाहीं. तेव्हां एवढी लोकसेवा केल्यानें जर पुण्य मिळतें आहे तर ती कां करूं नये ? शिवाय लक्षावधि लोकांना उत्सवाच्या निमित्तानें आपलें दर्शन घडत असतें. उत्सव केला नाहीं तर त्यांचीहि निराशा होईल. या सर्व कारणास्तव आपण कृपा करून आम्हांला उत्सव करण्याची परवानगी द्यावी. ”

सिद्ध म्हणाले, “ तुमचा जर निर्धारच असेल तर तुम्ही उत्सव करा; परंतु उत्सवाची सर्व जबाबदारी तुम्हीं आपल्या शिरावर घेतली पाहिजे ! ”

असें बोलून सिद्ध हंसले. उत्सव करण्याची परवानगी मिळाल्यामुळें सर्वांना आनंद झाला आणि सर्वजण आपआपल्या घरीं निघून गेले.

भक्तांनीं उत्सव पार पाडण्याचा आपला निश्चय व्यक्त केल्यावर सिद्धारूढ आपल्या मठांत भक्तांची चिंता करीत बसले मठाजवळच्या तलावांत पाण्याचा एक थेंबहि नव्हता. उत्सवांत मुख्यतः पाण्याचीच आवश्यकता होती. दुसरी कशाचीहि ददात नव्हती. दुसऱ्या दिवशीं सिद्ध एक मडकें घेऊन तळ्याजवळ आले आणि तळ्यांतील जमिनीवर बसले. तेथें ते गाडग्यावर हात ठेवून तीन तास स्वस्थ बसून राहिले होते. नंतर तें मडकें घेऊन

सिद्ध मठांत आले. त्या वेळीं मडक्यांत पाहिलें असतां त्यांत पाणी आढळून आलें. नंतर थोड्याच वेळानें आकाश अभ्राच्छादित झालें; विजा चमकूं लागल्या आणि मुसळधार पाऊस पडूं लागला. जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें आणि सर्व तलाव पाण्यानें तुडुंब भरला व तलावांतून पाणी बाहेर वाहूं लागलं. तुकप्पा आनंदानें बेहोष झाला. सर्व भक्तांचा मेळा तलावाजवळ जमला. सिद्धांना तेथें नेऊन सर्वांनीं त्यांची पूजा केली. ज्यानें त्यांची टवाळी केली होती त्याला पश्चात्ताप झाला. त्यानें सिद्धांची क्षमा मागितली. सिद्ध म्हणाले, "तुम्हांला पश्चात्ताप झाला हीच तुम्हांला क्षमा आहे. तुम्ही अहर्निश परमेश्वराचें चिंतन करा म्हणजे तुम्ही सुखी व्हाल आणि दुःखाचा लवलेशहि उरणार नाहीं."

सिद्धारूढ आपल्या भक्तांचें संरक्षण करण्यांत सदैव दक्ष असत. त्यांच्या ठिकाणीं अंतर्साक्षित्व असल्यामुळें त्यांचा एखादा भक्त कोठें संकटांत पडला असतां त्यांना लागलीच त्याचें ज्ञान होत असे आणि ते त्याला संकटांतून सोडविण्यासाठीं ताबडतोब तेथें जात. सिद्धांचे भक्त अगदीं प्रातःकाळीं उठून सिद्धांची पूजा करीत असत. सर्व भक्तांत लवकर उठणारा 'शिवाय नमः' नांवाचा भक्त होता. तो भक्तांच्या दारापाशीं जाऊन त्यांना जागें करण्यासाठीं 'शिवाय नमः' या अक्षरांचा उच्चार मोठ्यानें करीत असे. यामुळें त्याचें नांवहि 'शिवाय नमः' असें पडलें होतें.

एके दिवशीं पहाट झाली असें समजून 'शिवाय नमः' ऐन रात्रीं एक वाजतांच जागा झाला आणि नित्यक्रमाप्रमाणें भक्तांना जागें करण्यासाठीं 'शिवाय नमः' या शब्दांचा घोष करीत रस्त्यांतून निघाला. एवढ्या रात्रीं तो मोठमोठ्यानें ओरडत चालला असतांना, रस्त्यावरील गस्तवाल्यांनीं त्याला पकडून पोलिसचौकीवर नेलें आणि त्यानें ओरडूं नये म्हणून त्याच्या तोंडांत बोळे कोंबले. कारण चौकीवर त्याला नेत असतांना त्याच्या तोंडानें 'शिवाय नमः' असा घोष चालूच होता.

'शिवाय नमः' याला चौकीवर अडकवून ठेवल्याचें सिद्धांना अन्तर्ज्ञानानें समजलें. तेव्हां सिद्ध फौजदाराच्या वेषांत घोडयावर बसून चौकीवर गेले आणि त्यांनीं पोलिसांना विचारलें, "या माणसाला येथें कशाला आणलांत? यानें काय केलें?"

शिपाई म्हणाले, "हा विनाकारण ओरडून झोपीं गेलेल्या माणसांना त्रास देत होता म्हणून त्याला आम्ही पकडून आणलें."

तेव्हां फौजदार त्यांना म्हणाले, "तुम्ही हुशियार असें ओरडून लोकांना जागवितां आणि चोरांपासून त्यांचें रक्षण करतां व हें करण्यासाठीं तुम्ही पगार घेतां; पण हा बिचारा पगार न घेतां तुमचेंच काम करीत आहे. शिवाय तो ईश्वराचें नांव घेत असल्यानें तो लोकांचें अंतर्बाह्य चोरांपासून रक्षण करीत आहे. म्हणून त्याला त्वरित सोडून द्या!"

फौजदाराच्या आज्ञेप्रमाणें शिपायांनीं त्याला लगेच सोडून दिलें. फौजदारांनीं 'शिवाय नमः' याला आपल्या कामावर जाण्याची आज्ञा दिली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं फौजदार जेव्हां चौकीवर आले तेव्हां पूर्वरात्रीं घडलेल्या प्रकाराबद्दल शिपाई क्षमा मागूं लागले. तेव्हां फौजदार त्यांना म्हणाले, "तुम्ही क्षमा कशासाठीं मागतां? मी तर सर्व रात्रभर घरींच झोंपलों होतों."

मग चौकीवर रात्रीं घडलेली हकीगत शिपायांनीं फौजदारांना सांगितली. तेव्हां सर्व प्रकार फौजदारांच्या लक्षांत आला. या गोष्टीचा खुलासा करून घेण्यासाठीं सर्वजण सिद्धांकडे गेले. सिद्ध म्हणाले, "हा सर्व सद्गुरुमहिमा आहे. तो आपल्या भक्ताचें संकट निवारण करण्याकरितां चौकींत गेला असेल."

* * *

## गंगायमुना संगम : ९

तरुणपणीं सिद्ध जेव्हां हुबळींत राहूं लागले त्या वेळीं कित्तुर या गांवीं एक महात्मा राहत असे. तो अत्यंत विद्वान् आणि वेदशास्त्रपारंगत होता. त्याच्याकडे विद्या शिकण्यासाठीं मडिवाळप्पा या नांवाचा एक ब्रह्मचारी येत असे. तोहि सर्व शास्त्रांत पारंगत झाला. त्याच्या ब्रह्मचर्याची परीक्षा पाहण्यासाठीं त्याच्याकडे नवयौवनसंपन्न अशा दोन कुमारी आल्या; परंतु मडिवाळप्पाचें मन यत्किंचितहि विचलित झालें नाहीं. उलट त्या तरुणींचा उपसर्ग टाळण्यासाठीं त्यानें आपला आश्रम सोडला आणि तो काशीला गेला. आपल्या विद्वत्तेच्या जोरावर त्यानें तेथें अनेक विद्वान् पंडितांना वादांत जिंकलें. त्यामुळें सर्व काशीक्षेत्रांत त्याची ख्याति झाली.

एकदां तो विश्वनाथाचें दर्शन घेऊन एकान्तांत बसला असतां त्याच्या मनांत विचार आला कीं, “ मी मोठ्या विरक्तीनें येथें आलों; पण अनेक पंडितांचा वादांत पराजय केल्यामुळें मीं त्यांना किती दुःख दिलें ! मी इंद्रियांच्या विषयांचा त्याग केला; पण मानसन्मानाच्या मागें लागलों ! मनांत अभिमान उत्पन्न झाला आणि परमार्थाला आंचवलों. ”

‘ आजपासून मी तोंडांतून संस्कृत भाषेचा उच्चार करणार नाहीं ’ म्हणून त्यानें सर्वस्वाचा त्याग केला आणि हिमालयांत जाऊन तो एकान्तांत तपश्चर्या करूं लागला. लवकरच त्याची चित्तवृत्ति शांत झाली आणि ब्रह्मस्थिति स्थिरावली. त्याचें आत्मज्ञान दृढ झालें. मुखावर शांतितेज विलसूं लागलें आणि त्याला जीवन्मुक्तदशा प्राप्त झाली. अध्यात्मांत तो पराकोटीला पोंचला होता.

अशा प्रकारें तो आत्मज्ञान संपादून परत कित्तूरला आला; पण ती राजधानी उद्ध्वस्त झाली होती. म्हणून मडिवाळस्वामी गरगगांवांत

जाऊन राहिले. त्यांची जीवन्मुक्त-स्थिति पाहून असंख्य भक्त रोज त्यांच्या दर्शनाला येत असत. एका भक्तानें त्यांना मठ बांधून दिला होता. पुढें पुढें स्वामींची दृष्टि गेली होती.

याच वेळीं सिद्धारूढस्वामी भक्तांच्या उद्धारासाठीं हुबळी येथें येऊन राहिले होते ते मडिवाळस्वामींची कीर्ति ऐकत होतेच. एकदां सिद्ध आपल्या भक्तमंडळींसह मडिवाळस्वामींना भेटण्यासाठीं गरगगांवीं गेले. दोन संत एके ठिकाणीं जमले. त्या उभयतांचा पुढीलप्रमाणें संवाद झाला.

मडिवाळस्वामी—आपलें नांव काय ?

सिद्धारूढ—मला आरूढ असें म्हणतात.

मडिवाळस्वामी—तूं आरूढ म्हणून सांगतोस त्याचा अर्थ काय? तूं आकाशांतून पडलास का ? आईनें तुझें नांव काय ठेवलें ? तूं आईच्याच कुशींतून आलास ना ?

सिद्ध—तसें पाहिलें तर मी मायेचें आवरण घेऊन ब्रह्मांतून आलों आहें. ' उदरीं जनन ' भ्रामक आहे.

सिद्धांना मडिवाळस्वामींनीं जवळ बोलाविलें आणि स्वामींनीं सिद्धांच्या शरीराला स्पर्श केला तेव्हां त्यांना सिद्धांचें शरीर कृश झाल्याचें आढळलें. त्यांनीं तर्क केला कीं, सिद्धांनीं घोर तपानें आपली काया कृश करून घेतली असली पाहिजे.

नंतर मडिवाळस्वामींचा व सिद्धांचा योगविषयक जो संवाद झाला तो सामान्य जनाला आकलन होण्यासारखा नव्हता. त्यांत फक्त दोन महात्म्यांच्या अंतरींच्या खुणा एकमेकांनीं एकमेकांस पटविल्या. मडिवाळ-स्वामींना सिद्धांचे अनुभवयुक्त बोल आणि चतुर भाषण ऐकून इतका आनंद झाला कीं, त्यांनीं सिद्धांना कडकडून आलिंगन दिलें.

इतक्यांत बाहेर एकदम रडारड चालल्याचा आवाज ऐकूं आला. तो ऐकून दोघेहि महात्मे बाहेर आले. तेव्हां एका गृहस्थाला साप चावला

असून त्याचीं बायको-मुलें रडत आहेत असें दृश्य त्यांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां मडिवाळस्वामींनीं त्यांना सांगितलें कीं, ' सिद्धांचे पाय धुवा आणि तें पाणी, ज्याला साप चावला आहे त्यांच्या अंगाला लावा आणि थोडें पाणी त्याच्या तोंडांत घाला. नंतर भजन करीत राहा म्हणजे तो मनुष्य लगेच उठेल ! ''

मग सिद्धांना आसनावर बसवून त्यांचे पाय धुतले, व तें पाणी साप चावलेल्या माणसाच्या अंगाला लावलें आणि त्याच्या तोंडांत घातलें. थोडा वेळ भजन केल्यावर तो मृत देह हालूं लागला आणि थोड्याच वेळांत उठून बसला. त्याच्या पत्नीनें व त्यानें जीवदान दिल्याबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली, सिद्धांना भक्तिपूर्वक नमस्कार केला आणि ते आपल्या घरीं आनंदानें निघून गेलें.

सिद्ध कांहीं दिवस मडिवाळस्वामींच्या सहवासांत राहिले त्या अवधींत सिद्धांना पाहण्यासाठीं पुष्कळ लोक येत असत. त्या वेळीं सिद्ध योगवासिष्ठ वाचीत असत. मोठमोठे पंडित, विद्वान् लोक त्या ठिकाणीं येत असत. तेथें दोन ब्रह्मज्ञान्यांना पाहून आपण गंगायमुनेचा संगमच पाहात आहोंत असा लोकांना भास होई. गरगगांव हें मुमुक्षूंना एक पवित्र क्षेत्रच झालें होतें. मडिवाळस्वामी आणि सिद्ध यांच्यामध्यें नेहमीं वेदान्तावर चर्चा होत असे

कांहीं दिवस गरगगांवांत मुक्काम केल्यावर सिद्ध हुबळीस जाण्यासाठीं निघाले. तेव्हां मडिवाळस्वामी त्यांना म्हणाले, " आतां संचार पुरे झाला. तुम्हीं यापुढें हुबळींतच वास्तव्य करा. तेथेंच तुमचें वैभव वाढेल. आजपर्यंत कैक ऋषिमुनींना स्त्रियांनीं नाडलें आहे. तुम्हीं आपलें मन स्त्रियांपासून आवरून ठेवा. मला कधींहि विसरूं नका. तुमचें ज्ञान अखंडित राहो ! "

असें सिद्धांना सांगून, मडिवाळस्वामी त्यांना दूरवर पोंचविण्यास गेले. श्रीरामाचा विरह झाल्यावर दशरथाची जी अवस्था झाली तशीच सिद्ध

गेल्यावर माडिवाळस्वामींची झाली. त्यांना त्यांच्या शिष्यांनीं त्यांच्या मठांत आणून पोचविलें. माडिवाळस्वामी जीवनन्मुक्त कोटींतील सत्पुरुष होते. त्यांचे भक्त असंख्य होते. स्वामींनीं जेव्हां आपला देह ठेवला तेव्हां गरग-गांवांत त्यांच्या भक्तांनीं त्यांचें समाधिमंदिर बांधून त्यांच्याविषयीं असलेली आपली श्रद्धा व्यक्त केली.

कोंकणांत एक ब्राह्मण राहात होता. त्याच्या पत्नीला भूतबाधा झाली होती. ती नाहींशी व्हावी म्हणून पुष्कळ मंत्रतंत्रादि उपाय केले; पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. म्हणून तिच्या पतीनें तिला नरसोबाच्या वाडीला नेलें व तेथें नवस केला कीं, भूतबाधा नाहींशी झाली तर शंभर रुपये देवापुढें ठेवूं. असा नवस करून ते भक्तिभावानें देवाची सेवा करूं लागले.

एके दिवशीं त्या स्त्रीला नृसिंहमूर्तीनें दृष्टान्त दिला कीं, " तूं हुबळींत जाऊन माझें शरीर धारण करून असलेल्या सिद्धांकडे जा म्हणजे ते तुझा नवस पूर्ण करतील. "

त्याप्रमाणें ती आपल्या पतीसह नरसोबाच्या वाडीहून हुबळीस गेली. त्यांनीं सिद्धांना सर्व वृत्तान्त निवेदन केला. सिद्ध त्यांना म्हणाले, " तुम्हीं येथें राहून नित्य भजन करीत जा म्हणजे सर्व पीडा दूर होईल. "

सिद्धांच्या आज्ञेप्रमाणें तें दांपत्य सतत भजनांत दंग असे. लवकरच तिची भूतबाधा नष्ट झाली. पतिपत्नी उभयतां सिद्धांना म्हणाली, " आपल्या कृपेनें आमची पीडा नाहींशी झाली आहे. आतां आपले चरण सोडून जावेंसें वाटत नाहीं. "

तेव्हां त्यांना सिद्ध म्हणाले, " आतां तुमचें काम झालें आहे. तेव्हां आतां तुम्ही आनंदानें आपल्या गांवीं जा आणि सद्गुरूचें नेहमीं चिंतन करीत जा ! "

नंतर सिद्धांचा निरोप घेऊन तीं उभयतां आपल्या गांवीं निघून गेलीं;

पण त्यांना नवस फेडण्याविषयीं काळजी उरली होती. आपण नवस तर नरसोबाच्या वाडींतील श्रीनृसिंहाला केला आणि सिद्धांनीं तर आपली भूत-बाधा घालविली. तरी आतां नवसाचे शंभर रुपये नरसोबाच्या वाडींत देवापुढें ठेवावे, का हुबळी येथें सिद्धारूढांपुढें ठेवावे याविषयीं त्यांच्या मनांत शंका निर्माण झाली. त्याच रात्रीं श्रीनृसिंहमूर्ति त्या स्त्रीच्या स्वप्नांत येऊन "नवसाचे रुपये सिद्धांना द्या" असें सांगून लागलीच अंतर्धान पावली. हा दृष्टान्त झाल्यामुळें तें दांपत्य पुन्हां हुबळीला गेलें आणि त्यांनीं शंभर रुपये सिद्धांना अर्पण केले आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन आपल्या गांवीं परत आलें. सिद्धांनीं त्या पतिपत्नींना अनुग्रह दिल्यामुळें पुढें त्यांना आत्मस्वरूपाचा अनुभवहि आला.

❖ ❖ ❖

## साक्षात् शिवाचा अवतार : १०

निरूपादप्पा या नांवाचा एक सिद्धांचा परम भक्त हुबळी शहरांत रहात असे. सदासर्वकाळ तो सिद्धांच्याच मठांत पडलेला असे. तो कामधंदा कांहींच करीत नसे. त्याच्या घरीं त्याचा वडील भाऊ होता. निरूपादप्पा हा दोन्ही वेळां आपल्या भावाकडे जेवीत असे आणि त्यामुळें सर्वजण त्याचा तिरस्कार करीत. खुद्द सिद्धांनीं त्याला सांगितलें होतें कीं " कामधंदा केल्यावांचून तूं मठांत येत जाऊं नकोस ! "

निरूपादप्पा एकदां आपल्या भावाला म्हणाला कीं, " मी रोज मठांत सिद्धांना नैवेद्य नेत जाईन. " त्यावर त्याचा भाऊ संतापला आणि म्हणाला, " तुला काय घराचें वाटोळें करायचें आहे काय ? "

निरूपादप्पांचें सिद्धांवर अपार प्रेम असल्यानें तो आपल्या वाट्याला आलेल्या अन्नापैकीं निम्में अन्न बाजूला काढून ठेवी व जेवण झाल्यावर गुप्तपणानें तें मठांत नेऊन सिद्धांना अर्पण करी. सिद्ध सुद्धां ते चार घास मोठ्या प्रेमानें खात असत.

एकदां सिद्धाला निरूपादप्पाचा थोरला भाऊ भेटला असतां सिद्ध त्याला म्हणाले, " अरे, तूं रोज मला नैवेद्य कशाला पाठवीत असतोस ? "

भाऊ म्हणाला, " मी तुमच्याकडे नैवेद्य पाठवीत नाहीं. "

सिद्ध म्हणाले, " तुझा भाऊ तर रोज नैवेद्य घेऊन येत असतो. तरी आजपासून तूं आपल्या घरांतील देवालाच नैवेद्य दाखवीत जा. माझ्याकडे पाठवूं नकोस ! "

भाऊ घरीं आल्यावर तो निरूपादप्पाला म्हणाला, " उद्यांपासून जर तूं मठांत नैवेद्य नेशील तर तुझ्या गुरूची तुला शपथ आहे ! "

भावानें ताकीद दिल्याप्रमाणें निरूपादप्पानें मठांत अन्न नेलें नाहीं. आपण घरींच सिद्धांना नैवेद्य दाखवावा असा त्यानें विचार केला. तो

आपलें अन्न घेऊन एका खोलींत गेला व सिद्धांना उद्देशून म्हणाला, " सद्गुरुराया, आतां धावून ये. आज तुला कोण जेऊं घालणार ? कारण माझ्या भावानें मठांत न जाण्याबद्दल मला बजावलें आहे. म्हणून तूंच येथें ये आणि जेव. तूं जर आला नाहींस तर मी जेवणार नहीं ! "

असें म्हणून त्यानें सिद्धांची थोडा वेळ वाट पाहिली. जेव्हां सद्गुरु येईनात तेव्हां त्यानें वरच्या तुळईला दोरी बांधली आणि गळफांस लावून घेण्यासाठीं वर उडी मारली. इतक्यांत सिद्ध तेथें प्रकट झाले आणि निरूपादप्पाला त्यांनीं वरच्यावर धरलें. सिद्ध आल्यामुळें निरूपादप्पाला आतिशय आनंद झाला. त्यानें त्या भरांत सिद्धांना स्वतः भरविलें. जेवण झाल्यावर सिद्ध अंतर्धान पावले. मग रोजच्या रोज अशा प्रकारें सिद्ध नैवेद्य ग्रहण करीत असत.

निरुपादप्पा एकान्तांत काय करतो हें एकदां निरुपादप्पाचा वडील भाऊ पाहूं लागला असतां त्याला सिद्ध निरूपादप्पाबरोबर जेवीत असल्याचें दिसलें. सिद्ध गुप्तरूपानें आपल्या घरीं येऊन आपल्या भावा-बरोबर सहभोजन करतात हें पाहून तो अत्यंत चकित झाला आणि त्यानें एकदम खोलींत जाऊन सिद्धांचे पाय धरले. तो सिद्धांना म्हणाला, " महाराज आजपर्यंत मी आपणास ओळखलें नाहीं ! मी किती मूर्ख आहें ! माझा भाऊ आळशी असून कामधंदा करीत नाहीं म्हणून मी त्याच्यावर राग करीत असें, त्याचा तिरस्कार करीत असें ! त्याचाहि अधिकार मी ओळखला नव्हता. तरी आंता आपण माझ्या भावाला आपल्याबरोबर मठांत घेऊन जा. मी तुम्हां दोघाकरितां रोज मठांतच जेवण आणीत जाईन ! "

सिद्ध म्हणाले, " तुझ्या म्हणण्याप्रमाणें मी निरूपादप्पाला आपल्या-बरोबर मठांत घेऊन जातों. तो तेथें माझ्याजवळ आनंदानें राहील. त्याची काळजी करूं नकोस ! "

याप्रमाणें सांगून त्यांनीं निरूपादप्पाला आपल्याबरोबर मठांत नेलें.

निरुपादप्पाला अत्यंत आनंद झाला. तेव्हांपासून त्यानें आपला सर्व काळ गुरुसेवेंत घालविला. सेवा करीत असतानांच कालांतरानें तो कालवश झाला आणि त्याला सद्गति मिळाली.

हरिद्वार येथें एक विद्वान् ब्राह्मण राहत असे. त्याला कृष्ण नांवाचा एक मुलगा होता. हा ब्राह्मण नेहमीं तुळशीदासांचें रामायण वाचीत असे. कृष्ण मन लावून तें ऐकत असे. त्याला साधुपुरुषांच्या कथा ऐकण्यांत फार समाधान वाटत असे. कबीराचें चरित्र ऐकून आपण कबीरास रखें व्हावें असें त्यास वाटूं लागलें होतें. तो रोज गंगेच्या तीरावर जाऊन साधूंची सेवा करी. यामुळें त्याचें विद्याभ्यासाकडे लक्ष नसे. मुलाचा हा प्रकार पाहून त्याच्याविषयीं आईबापांना काळजी वाटूं लागली. कोणी साधु भेटला कीं त्याला कृष्ण घरीं आणून जेवायला घालीत असे. या वेळीं त्याचें वय फक्त दहा वर्षांचें होतें. एके दिवशीं त्याचे वडील त्याला म्हणाले, " तूं जर पुन्हां संताला घरीं घेऊन आलास तर मी त्याला धक्के मारून घराच्या बाहेर काढीन ! "

वडिलांचे हे शब्द ऐकून कृष्णाला फार दुःख झालें. त्याला धड जेवण सुचेना कीं झोंप येईना. एके दिवशीं तो गंगेवर गेला असतां त्याला एक साधु भेटला. तो म्हणाला, " गेले कित्येक दिवस मी उपाशी आहें. कारण मला अन्न चालत नाहीं. मी दूध घेत असतों; पण मला तें मिळत नाहीं. "

कृष्णाला त्याची दया आली. त्यानें वडिलांचे पैसे चोरले आणि तो बाजारांत जाऊन दूध घेऊं लागला. इतक्यांत त्याचा बाप त्या ठिकाणीं गेला आणि त्यानें कृष्णाला पैसे कोठून आणलेस म्हणून विचारलें. कृष्णानें सर्व खरी हकीगत सांगितली. बाप फार संतापला आणि त्यानें मुलाला घरीं आणून एका खांबाला बांधून टाकलें. कृष्ण श्रीरामचंद्राचा धावा करूं लागला. तो म्हणाला, " हे प्रभो, आतां त्या साधूला जर दूध मिळालें नाहीं तर तो भुकेनें तडफडून मरेल. तरी माझी येथून सुटका कर म्हणजे मी माझा देह विकून त्याला दूध पाजीन ! "

असा धांवा करीत असतांना कृष्णाच्या समोर तो साधु प्रगट झाला. त्यानें कृष्णाला प्रेमभरानें कुरवाळलें आणि तो म्हणाला, " तूं मुळींच काळजी करूं नकोस. मी सदैव तुझ्याजवळच वास करीन आणि तुला योग्य वेळीं सोडवीन. "

कृष्ण म्हणाला, " महाराज, आपण माझ्याजवळच सदैव राहा. तुम्ही जर मला अंतर दिलेंत तर माझे प्राण येथल्या येथें निघून जातील. "

मग साधूनें त्याला आश्वासन देऊन सांगितलें, " तूं निर्धास्त राहून माझ्या स्वरूपाचें ध्यान कर. "

असें सांगून तो साधु गुप्त झाला आणि तेथें एकदम श्रीराम दिसूं लागले. त्या वेळीं त्यांच्या दिव्य तेजानें सर्व दिशा उजळून निघाल्या. भगवंताचें तें दिव्य रूप पाहून कृष्ण ब्रह्मानंदांत निमग्न झाला. तो आपला देहभाव विसरून गेला आणि त्याची वृत्ति राममय झाली. नंतर श्रीराम त्याला मधुर वाणीनें म्हणाले, " तुझ्या अनंत जन्मांतील पुण्यसंचयानें तूं माझें रूप पाहूं शकलास. तुझी साधुसंतांविषयीं भक्ति किती आहे याची परीक्षा घेण्यासाठीं मी मुद्दाम आलों. आतां माझी खात्री झाली कीं, साधु-संतांवरील तुझें प्रेम निःसीम आणि अढळ आहे. हल्लीं आहेस त्याप्रमाणेंच तूं साधुसेवेंत मग्न राहा. थोडयाच दिवसांत तुलाहि त्यांची योग्यता प्राप्त होईल. तूं अखंड माझें नामस्मरण करीत राहा म्हणजे मी सतत तुझ्या-जवळ आहे असें समज ! "

असें सांगून श्रीराम अंतर्धान पावले.

इतका प्रकार झाल्यावर कृष्णाच्या वडिलांच्या वृत्तींत एकाएकीं बदल झाला. आतांपर्यंत त्यांच्या मनांत कृष्णाबद्दल जी विपरीत भावना होती ती पार मावळून गेली. त्यांना कृष्ण जसा पूर्वीं दिसत होता तसा तो आतां दिसेनासा झाला. त्याच्या चेहऱ्यासभोंवतालीं एक प्रकारचें तेजो-वलय निर्माण झालें होतें. तें पाहून वडील त्याला म्हणाले, " कृष्णा, तुझ्या

चेहऱ्यावर फारच तेज चमकत आहे; आतां तूं वाटेल तें कर. मी तुला कांहींहि बोलणार नाहीं; पण मात्र तूं घरांतच राहा!"

आपल्याविषयीं वडिलांचें मन स्वच्छ झालेलें पाहून कृष्णाला समाधान वाटलें आणि तेव्हांपासून तो साधुसंतांचें आदरातिथ्य करूं लागला.

कृष्णा सोळा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या वडिलांनीं बळेंच त्याचें लग्न करून टाकलें. नंतर तो एक वर्ष घरीं राहिला. नंतर त्याला एक साधु भेटला. त्या साधूनें त्याला बोध केला. त्यामुळें कृष्णाला वैराग्य प्राप्त झालें आणि तो आपले आईवडील आणि पत्नी यांना सोडून त्या साधूबरोबर जाण्यास निघाला. ते दोघे एका अरण्यांत गेले. तेथून क्षेत्रें पाहात पाहात ते काशींत गेले. तेथें त्यानें एका संन्याश्याची सेवा केली. त्यांनीं विचारल्यावरून कृष्णानें त्यांना सांगितलें कीं, "मला कोणीहि नाहीं." नंतर त्याला संन्यासदीक्षा देण्यांत आली. त्याला प्रणवदीक्षा देण्यांत येऊन त्याचें नांव गोविंदानंद असें ठेवलें. कांहीं दिवसांनीं गुरूंची आज्ञा घेऊन गोविंदानंद संचारार्थ निघाले. ते द्वारकेला आले. तेथें त्यांची आणि शिवानंदांची भेट झाली. शिवानंद त्यांना म्हणाले, "साक्षात् शिवावतार म्हणून प्रसिद्ध असलेले सिद्धारूढस्वामी जे आहेत त्यांचा मी शिष्य आहें. त्यांचें माझ्यावर फार प्रेम आहे. माघ व श्रावण महिन्यांत हुबळी येथें मोठे उत्सव होत असतात. त्यासाठीं लागणारी सामग्री मी साऱ्या देशांतून गोळा करतों आणि ती घेऊन हुबळींत जातों. तुम्हीं त्यांना जर एक वेळ पाहाल तर तुम्हांला शांतिसुखाचा लाभ होईल."

शिवानंदांनीं सिद्धांचें केलेलें वर्णन ऐकून गोविंदानंदांना आनंद झाला आणि सिद्धांना पाहण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली. म्हणून ते उभयतां ताबडतोब द्वारकेहून निघून हुबळीस आले. त्या वेळीं मध्यरात्र झाली होती. ते सिद्धाश्रमांत गेले तेव्हां आश्रमांतील लोक गाढ झोपीं गेले होते. गोविंदानंदांनीं आश्रमांत पाऊल टाकण्याचा अवकाश कीं सिद्धारूढ

त्यांच्यापुढें हजर. गोविंदानंदांनीं त्यांना विचारलें, " महाराज, सिद्धारूढ यतीश्वर कोठें आहेत ? "

सिद्ध म्हणाले, " आपल्याला भूक लागली आहे तरी अगोदर आंत चला. "

गोविंदानंदांनीं विचार केला कीं, आपल्याला भूक लागली हें या गृहस्थाला कसें समजलें ? आपल्याला ' आंत चला ' असें म्हणणारे गृहस्थ हेच सिद्ध आहेत असें गोविंदानंदांना समजलें नव्हतें. सिद्धांनीं त्यांचा हात धरून त्यांना आंत नेलें. त्यांनीं एका शिष्याला उठवून गोविंदानंदांना जेवण देण्यास सांगितलें. गोविंदानंदांनीं सांगितलें कीं, " सिद्धदर्शन झाल्यावांचून मी जेवणार नाहीं ! " शिष्यानें त्यांना सांगितलें कीं, " तुम्हांला ज्यांनीं आंत आणलें तेच सिद्ध आहेत. "

तेव्हां गोविंदानंदांनीं सिद्धांना अत्यंत प्रेमानें वंदन केलें. सिद्ध हे साक्षात् शिवाचा अवतार असल्याची त्यांना प्रचीति आली. मग गोविंदानंद म्हणाले, " महाराज, आतां मी आपले दिव्य चरण सोडणार नाहीं. माझी आपणांला फक्त एवढीच प्रार्थना आहे कीं, आपल्या पूज्य कीर्तीचें वर्णन करण्यास मला बुद्धि द्यावी. "

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १०८५८

## भक्तांची हांक : ११

काळप्पा बडिगेर या नांवाचा एक सिद्धांचा प्रेमळ भक्त होता. त्यानें एके दिवशीं सिद्धांना आपल्या घरीं भोजनाचें आमंत्रण दिलें व बाजारांतून आंबे आणले. आंबे फोडून पाहतां त्यांत किडे निघाले. तेव्हां काळप्पा मनांत खिन्न झाला आणि तो दुसरे आंबे आणण्यासाठीं बाजारांत जाऊं लागला. सिद्ध म्हणाले, " बाजारांत जाऊं नकोस; ते आंबे इकडे घेऊन ये. "

त्यांनीं ते आंबे आपल्या हातांत घेतले आणि म्हणाले, " यांत मला तर एकहि किडा दिसत नाहीं आणि यांचा रसहि फार गोड आहे. "

काळप्पानें पाहिलें तर त्या आंब्यांत एकहि किडा दिसला नाहीं. तो चमत्कार पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. काळप्पानें विचार केला कीं, " सद्‌गुरूंच्या नुसत्या हस्तस्पर्शानें निर्जीव आंबा जर शुद्ध होतो तर मानवासारखा सजीव प्राणी कां शुद्ध होणार नाहीं ? सद्‌गुरूंच्या मुखांतून निघालेलें नामरूप अमृत देहांत मिसळल्यावर मनुष्याचें चित्त तत्काळ निर्मळ होतें. "

मग सिद्धांसह सर्वांनीं आनंदानें भोजन केलें. नंतर काळप्पानें सिद्धांना विडादक्षिणा वगैरे देऊन त्यांना मठांत नेऊन पोंचविलें.

तुकप्पा नांवाचा सिद्धांचा एक भक्त गुरुसेवेंत नेहमीं तत्पर असे. तो आपल्या घरीं दरवर्षीं नवरात्राचा उत्सव साजरा करीत असे आणि त्या वेळीं सद्‌गुरूंना आपल्या घरीं बोलावीत असे. एके वर्षीं तो सिद्धांना बोलावणें करण्यासाठीं निघाला असतां त्याची बायको त्याला म्हणाली, " इकडे आपला मुलगा मृत्युपंथाला लागला आहे, अशा स्थितींत तुम्ही सिद्धांना कशाला बोलवायला जातां ? "

तेव्हां तुकाप्पा आपल्या मुलाजवळ—हनुमंताजवळ—जाऊन त्याला

म्हणाला, " बाळ, आतां सद्‌गुरु येतील आणि ते आल्यावर तुला बरें वाटेल. तुझा जीव घाबरायला लागला तर तूं फक्त सद्‌गुरूंचें चिंतन करीत राहा. ते तुझें रक्षण करतील. काळजी करूं नकोस ! "

हनुमंतानें वडिलांचें म्हणणें मान्य केलें; पण त्याच्या आईला मात्र रडूं आवरेना. मग तुक्कप्पा तिला म्हणाला, " हनुमंत आजारी असतांना तो सुद्धां रडत नाहीं आणि तूं मात्र रडून मला विघ्न करीत आहेस हें बरें नाहीं. तरी आतां मी गुरूंना घेऊन येऊं का तें स्पष्ट सांग. " तिनें आपलें रडें आवरलें आणि सिद्धांना आपल्या घरीं घेऊन या असें तुक्कप्पाला सांगितलें. मग सर्व मायापाश बाजूला सारून तुक्कप्पा मठांत गेला आणि सद्‌गुरूंना आपल्या घरीं घेऊन आला. त्यांना मंडळींत बसवून नंतर कीर्तनाला आरंभ केला. कीर्तन ऐन रंगांत आलें असतां घरांत हनुमंताचा जीव फार घाबरूं लागला. तेव्हां त्यानें वडिलांनीं सांगितल्याप्रमाणें सद्‌गुरूंचें चिंतन सुरू केलें. तो सिद्धांना उद्देशून म्हणाला, " सद्‌गुरु-नाथा, मला या वेळीं तुझें दर्शन होत नाहीं ना ? मला आतां उठून बस-ण्याचीसुद्धां शक्ति राहिली नाहीं. आतां माझे प्राण व्याकूळ होत आहेत. मी तुला हांक मारली तर कीर्तनांत विघ्न येईल. माझ्या वेदना जाणून मला जर एकदांच दर्शन दिलेंस तर मी सुखानें प्राण सोडीन ! "

अशा वेळीं इकडे तर कीर्तनाला रंग भरला होता. सिद्ध मंडपांत बसले होते. ते एकदम उठले आणि तुक्कप्पाला म्हणाले, " मला आत्तांच्या आत्तां हनुमंताकडे घेऊन चल. "

तुक्कप्पा सिद्धांना तिकडे नेण्याचें प्रथम टाळूं लागला. शेवटीं सिद्धांनीं हट्टच धरल्यामुळें तुक्कप्पाचा नाईलाज झाला आणि त्यानें सिद्धांना हनुमंतापाशीं नेलें. सिद्धांनीं त्याच्या अंगावरील घोंगडी बाजूला काढली. तेव्हां तो शेवटच्याच पंथाला लागला होता. सिद्धांनीं ' शिवाय नमः ' या मंत्राचा उच्चार करून त्याच्या अंगावरून हात फिरविला तेव्हां त्याच्या

चेहऱ्यावर आलेली मृतकळा पार नाहींशी होऊन चेहरा सतेज दिसूं लागला. त्याच्या अंगांत एकदम शक्ति आली आणि तो उठून बसला. हें पाहून तुकप्पाला आणि त्याच्या पत्नीला परमावधीचा आनंद झाला. हनुमंताच्या मातेनें कृतज्ञतापूर्वक सिद्धांचे पाय धरले. तुकप्पानें सिद्धांना विचारलें, " महाराज, हनुमंत आजारी असल्याबद्दल तुम्हांला कोणीं सांगितलें नसतां तुम्हांला तें कसें समजलें ? "

सिद्ध म्हणाले, " माझे कान भक्तांचे शब्द ऐकण्यासाठीं नेहमीं तत्पर असतात. हनुमंताचा आर्त स्वर कानीं पडला म्हणूनच कीर्तनाला रंग चढला असतांना सुद्धां मी इकडे धांवत आलों. आतां हनुमंताला मृत्यूचें भय उरलें नाहीं. त्याला दंडाला धरून कीर्तन ऐकण्यासाठीं आणून बसवा. "

हनुमंत मंडपांत आल्यावर सिद्धांना म्हणाला, " माझी प्रार्थना ऐकून माझ्या रक्षणासाठीं तुम्हीं धावून आलांत आणि माझे प्राण वांचविलेंत यामुळें हा माझा देह आपणांवरून ओवाळून टाकावा असें वाटत आहे. "

सिद्ध त्याला म्हणाले, " तुझ्यासारखे प्रेमळ भक्त कोठें बरें मिळतात ? आतां मीच तुझे आईवडील आहे असें समजून तूं त्यांची सेवा करीत जा ! "

नंतर तुकप्पानें त्यांची यथासांग पूजा केल्यावर सिद्ध आपल्या आश्रमांत निघून गेले.

तम्मण्णाशास्त्री या नांवाचा सिद्धांचा एक श्रेष्ठ भक्त नवलगुंद या गांवीं राहात असे. पुढें तो हुबळींत राहून पुराण सांगत होता. तो अत्यंत विद्वान् असून त्याची वाणी रसाळ असल्यानें त्याच्या पुराणाला असंख्य श्रोत्यांची गर्दी होत असे. त्याचें पुराण ऐकून श्रोत्यांना ज्ञान होऊन समाधान होत असें. तो अत्यंत निराभिमानी आणि विरक्त असे. संसार असार आहे असें समजून तो संसाराला विटला होता. त्याला संसारांत सर्वत्र दुःखच दिसत असें. एके दिवशीं तम्मण्णाशास्त्री सिद्धारूढांकडे आला

आणि त्यांना म्हणाला, " सद्गुरुनाथा, जे मुमुक्षु आपल्या चरणांचा आश्रय करतात त्यांना अभंगपदाचा लाभ होतो अशी आपली कीर्ति ऐकल्यामुळें मी आपणांकडे आलों आहें. या कष्टमय संसारामुळें मी अतिशय वैतागून गेलों आहे. त्यांतून सुटण्याचा मार्ग दाखविणारा आपल्या शिवाय दुसरा मला कोणी दिसत नाहीं. तरी कृपा करून मला मार्गदर्शन करा ! "

शास्त्रीबुवांचे हे बोल ऐकून सिद्धरूढांना त्यांची दया आली. शास्त्री-बुवांना ते म्हणाले, " बाह्यतः संसार नेटका करून अंतर्यामी पूर्ण वैराग्य असावें आणि इतर जनाचा उद्धार करावा. यापेक्षां तुम्हांला जास्त उपदेश करण्याची गरज नाहीं; तरी पण गोंदवलें गांवांत साक्षात् ब्रह्मचैतन्य वास करीत आहेत. तेथें जाऊन तुम्हीं त्यांना शरण जा आणि भगवंताचा गीतेंतील उपदेश नित्य डोळ्यांसमोर ठेवा ! "

सिद्धांनीं केलेल्या मार्गदर्शनानें तम्मण्णाशास्त्र्यांना आनंद झाला आणि ते सिद्धांचा आशीर्वाद घेऊन आपल्या घरीं आले. नंतर लवकरच एके दिवशीं हुबळीहून निघून शास्त्रीबुवा गोंदवलें येथें आले. तेथें ते ब्रह्मचैतन्य महाराजांकडे जाऊन त्यांनीं आपलें सर्व वृत्त त्यांना निवेदन केलें. ते म्हणाले, " महाराज, मी आपल्याला शरण आलों आहें. माझें हित कशांत आहे तें मला सांगा. "

महाराजांनीं शास्त्रीबुवांचा अधिकार पाहून ते त्यांना म्हणाले, " तुझें हुबळी हें राहण्याचें ठिकाण असून तेथील सिद्धारूढस्वामींनीं तुला मज-कडे पाठविलें आहे. तरी तूं 'श्रीराम जय राम जय जय राम' या मंत्राचा तेरा लक्ष जप कर म्हणजे तुझ्या भवभ्रमाचें निरसन होईल. "

ब्रह्मचैतन्य महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें शास्त्रीबुवांनीं अनुष्ठानाला सुरुवात केली आणि यथाकाल तेरा लक्षांचें पुरश्चरण पुरें केलें. जपाच्या शेवटीं श्रीरामचंद्रांनीं शास्त्रीबुवांना प्रत्यक्ष दर्शन दिलें. कोटिसूर्यांच्या

ठाणें. स्थळप्रत
मराठी

तेजाला लाजवील अशी प्रभुरामचंद्रांची तेजःपुंज मूर्ति पाहून तम्मण्णाशास्त्री आपलें देहभान विसरून गेले, आणि त्यांची समाधि लागली. समाधि उतरल्यावर त्यांनीं श्रीरामचंद्रांना प्रार्थना केली कीं, “ आपल्या दर्शनाचा लाभ नित्य व्हावा; यापेक्षां मला दुसरी कसलीहि इच्छा नाहीं ! ”

प्रभु रामचंद्र म्हणाले, “ तूं जेव्हां जेव्हां माझ्या नामाचा जप करशील तेव्हां तुला माझें दर्शन घडेल. ”

असें सांगून ती प्रभुरामचंद्राची दिव्य मूर्ति अंतर्धान पावली.

नंतर शास्त्रीबुवांनीं अत्यंत प्रेमानें ब्रह्मचैतन्यगुरूंना वंदन केलें तेव्हां ब्रह्मचैतन्य म्हणाले, “ तुला सच्चिदानंद सिद्धांनीं मजकडे पाठविलें म्हणून मी तुझें नांव ‘ सच्चिदानंद ’ असें ठेवतों. आतां तूं येथून जाऊन लोकांचा उद्धार कर. ”

मग ब्रह्मचैतन्यांचा आशीर्वाद घेऊन शास्त्रीबुवा हुबळीस आले. ते सिद्धांना भेटले आणि म्हणाले, “ तुमच्या आज्ञेनें ब्रह्मचैतन्यमहाराजांनीं मला त्रयोदशाक्षरी मंत्र दिला. त्याच्या आज्ञेप्रमाणें मी त्या मंत्राचा जप केला आणि एक पुरश्चरण पुरें केलें. त्यामुळें मला प्रभु रामचंद्रांचें प्रत्यक्ष दर्शन होऊन मी कृतकृत्य झालों. ही सर्व आपली कृपा आहे. आतां अभिमान गलित होण्यासाठीं आपण मला उपाय सांगावा एवढी माझी आपणांला प्रार्थना आहे. ”

सिद्धारूढांनीं त्यांना सांगितलें कीं, “ आतां भिक्षा मागून तूं अन्नसंतर्पण कर ! ”

शास्त्रीबुवा म्हणाले, “ आपल्या आज्ञेप्रमाणें मी भिक्षा मागून दासनवमीचा उत्सव करून अन्नसंतर्पण करतों. त्या कामीं मात्र आपली कृपा दृष्टि असावी. ”

तम्मण्णाशास्त्रींनीं भिक्षा मागून अन्नधान्य व इतर सामग्री गोळा केली. सिद्धांच्या आज्ञेप्रमाणें एक विस्तीर्ण आणि भव्य असा मंडप घातला आणि

दासनवमीच्या उत्सवाला प्रारंभ केला. दूरदूरच्या प्रांतांतून कीर्तनासाठीं हरिदास येऊं लागले. रोज भजनकीर्तनाचा थाट चालू झाला. जो तो उत्सवांतील आनंद लुटीत होता. उत्सवाचे सात दिवस केव्हां आणि कसे निघून गेले हें कोणाला समजलेंहि नाहीं. आठव्या दिवशीं अन्नसंतर्पण झालें. गांवांतील सर्व लोकांना जेवण्याचें आमंत्रण दिलें होतें. दहा हजार लोकांसाठीं अन्न शिजविलें होतें. प्रथम चार चार हजारांच्या दोन पंक्ती जेवून उठल्या. आठ हजार माणसें जेवलीं. दोन हजार लोकांना पुरेल इतकेंच अन्न शिल्लक राहिलें. नंतर आठ हजार लोक जेवायला आले. त्यांना अन्न पुरणार कसें याची शास्त्रीबुवांना काळजी वाटूं लागली. त्यांनीं ही अडचण सिद्धांना कळविली. सिद्धांनीं अन्नावर आपली अमृतदृष्टि टाकली आणि सर्व मंडळींना जेवायला बसा म्हणून सांगितलें. आठ हजार लोक जेवायला बसले. दोन हजार लोकांना पुरेल इतकेंच अन्न होतें; पण तेवढ्याच अन्नांत आठ हजार लोक जेवून तृप्त झाले; इतकेंच नाहीं तर बरेंच अन्न शिल्लक राहिलें !

जेवायच्या वेळेला सिद्ध स्वतः उपस्थित होते. शास्त्रीबुवांना ते म्हणाले, “ तुम्हीं केवळ भिक्षेवर एवढी समाराधना केलेली पाहून मला फार समाधान झालें ! ”

फार अन्न शिल्लक नसतांना आठ हजार माणसें जेवलीं हें पाहून लोक आश्चर्यचकित झाले. उत्सवाला जमलेली मंडळी घरोघर निघून गेली. सिद्ध आपल्या आश्रमांत गेले. सात दिवस जेथें उत्सव झाला त्या मंडपांत चिटपांखरूहि राहिलें नाहीं.

तम्मण्णाशास्त्री उत्सवांतून मोकळे झाले आणि लोकांचा उद्धार कसा होईल याचा विचार करूं लागले. ते सिद्धांकडे गेले आणि त्यांना म्हणाले, “ लोकांचा उद्धार करण्यासाठीं त्यांना त्रयोदशाक्षरी मंत्र जपाला सांगावें असें मला वाटतें. प्रत्येकानें जरी थोडा जप केला तरी वर्षाच्या अखेरीस

पुष्कळच जपसंख्या होईल. लोकांना त्याची गोडी लागेल आणि लोक सन्मार्गाला लागतील. ”

शास्त्रीबुवांचें हें म्हणणें ऐकून सिद्धांना आनंद झाला. मग सिद्धांची आज्ञा घेऊन शास्त्रीबुवा लोकांना जप करण्यास सांगूं लागले. प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें जप करावा आणि आपली जपसंख्या कागदावर नोंदून ठेवावी अशी शास्त्रीबुवा सूचना देत असत. ज्या माणसांनीं जप सुरू केला त्यांत त्यांना गोडी वाटूं लागली. ती इतकी कीं प्रत्येकजण रिकाम्या गप्पा न मारतां सांपडेल तेवढा वेळ जपांत घालवूं लागला. प्रत्येकाची जपसंख्या अनपेक्षित अशी वाढूं लागली आणि जो संकल्प एक वर्षांत पुरा करण्याची शास्त्रीबुवांची इच्छा होती तो अवघ्या सहा महिन्यांतच पुरा झाला. शास्त्रीबुवांनीं पुष्कळांच्या अंतःकरणांत नामजपाची आवड निर्माण केली याबद्दलचें सर्व श्रेय शास्त्रीबुवांना आहे पण त्याबद्दल त्यांना कधींहि अभिमान वाटला नाहीं. ते सर्व श्रेय सिद्धांना देत.

* * *

## शरणाला अभय : १२

एकदां सिद्धारूढस्वामींजवळ सुमारें बारा वर्षांचा एक मुलगा आला आणि रडूं लागला. सिद्धांनीं त्याला विचारलें, “ बाळ तूं कां रडतोस ? कोठून आलास तूं ? आमच्याकडे तूं कशासाठीं आलास तें सांग. रडूं नकोस ! ”

मुलानें आपलें रडणें थांबविलें आणि तो सिद्धांना म्हणाला, “ महाराज, मला या जगांत माझें असें कोणीच राहिलें नाहीं. ज्यांना मी माझे म्हणून म्हणत होतों त्यांनीं मला घराच्या बाहेर हाकलून दिलें आहे. माझी आई, वडील, बहीण यांना मी आवडत नाहीं. मी शिवाची पूजा करतों म्हणून माझ्या आईनें मला घराच्या बाहेर काढलें. आपण साक्षात् शिवाचे अवतार आहांत अशी मी आपली कीर्ति ऐकली. शरण आलेल्याचें आपण रक्षण करतां असें मला समजलें आहे. यासाठीं मी आपल्या चरणांपाशीं धांव घेतली. आतां आपण तारा अगर मारा; मी आपले पाय सोडून दुसरीकडे कधींहि जाणार नाहीं. मी आपला भार सर्वस्वीं आपणांवरच सोंपवीत आहें.”

त्या मुलाचें हें निर्धाराचें बोलणें ऐकून सिद्धांना त्याची करुणा आली आणि सिद्धांनीं त्याला “ येथें माझ्याजवळच राहा ” म्हणून सांगितलें. सिद्धांनीं त्याचें नांव ‘ शरण ’ असें ठेवलें. तेव्हांपासून शरण सिद्धांजवळ त्यांच्या मठांत राहिला. रोज गांवांत जाऊन तो माधुकरी मागून आणी आणि ती सद्गुरुसमोर ठेवीत असे. गुरु त्या अन्नापैकीं त्याला जितकें देत तेवढेंच खाऊन तो समाधान मानीत असे. एके दिवशीं त्याची परीक्षा पाहण्यासाठीं सिद्धांनीं त्याला जेवायला बोलावलेंच नाहीं. तो सारखा सद्गुरुचिंतन करीत स्वस्थ राहिला. त्याला त्या दिवशीं उपास घडला तरी त्याचें समाधान भंगलें नाहीं. त्यानें दुसऱ्या दिवशीं नित्याप्रमाणें गांवांत जाऊन मधुकरी मागून आणली आणि ती गुरुपुढें ठेवली. त्या दिवशीं मधुकरीचें अन्न पुष्कळच आलें होतें. गुरूच्या आज्ञेवांचून अन्न खाणें तो विषभक्षणाप्रमाणें मानीत असे. गुरूंनीं जेवण्याची परवानगी दिल्यावांचून

जेवायचें नाहीं असा त्याच्या मनाचा पक्का निर्धार होता. सिद्धांनीं त्याला विचारलें, " काय रे शरण, काल तूं सर्व दिवसभर उपाशी होतास, आज तूं वाटेंत मधुकरींतील अन्न खाल्लें असावेंस अशी मला शंका येते. "

शरण म्हणाला, " महराज, माझा प्राण गेला तरी हरकत नाहीं; पण तुमच्या आज्ञेवांचून अन्न घेणार नाहीं असा माझा दृढनिश्चय आहे ! "

यावर सिद्ध कांहीं बोलले नाहींत. तेव्हां शरण त्यांना नमस्कार करून आपलें काम करण्यास निघून गेला. त्याची वृत्ति समाधानी होती. तो सर्वांशीं अति नम्रतेनें वागे आणि सदोदित सिद्धांच्या नांवाचा जप चालू ठेवी. दुसऱ्या दिवशींहि त्याला सर्व दिवस उपास घडला. त्याला उपास घडल्यामुळें अशक्तता आली होती, तरी तो आनंदांत होता.

तिसऱ्या दिवशीं शरण भुकेनें व्याकुळ झाला असतांना सिद्धांनीं त्याला सांगितलें कीं, " त्या पलीकडच्या झाडावर चढ आणि झाडावरील पिकलेलीं फळें तोडून खालीं टाक. " शरणला झाडावर चढण्याची शक्ति नव्हती तरी तो गुरूच्या आज्ञेमुळें कसाबसा झाडावर चढला आणि उंच फांदीवर गेला व पिकलेलीं फळें तोडून खालीं टाकूं लागला. फळें तोडतां तोडतां त्याचा तोल जाऊन तो झाडावरून खालीं कोसळला. झाडावर असतांना त्याचे हातपाय कांपत होते त्या वेळीं त्याच्या मनांत असा विचार आला कीं, " हा देह मी माझ्या गुरूला अर्पण केला आहे. त्यांत माझें कांहीं नाहीं. गुरूला वाटेल तर तो या देहाचें रक्षण करील नाहीं तर मला त्याचें दुःख होणार नाहीं ! "

शरण जमिनीवर जोराने आपटल्यामुळें बेशुद्ध झाला. त्याच्याकडे माणसें धांवून गेलीं. सिद्ध त्यांना म्हणाले, " घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. तुम्ही मठांत जा. मी एकटा शरणाजवळ बसतों. "

सिद्धांच्या सांगण्यावरून माणसें मठांत गेलीं आणि फक्त एकटे सिद्ध शरणापाशीं बसले. त्यांनीं त्याच्या छातीवरून आपला हात फिरविला.

शरण हळूहळू शुद्धीवर येत चालला. तेव्हां सिद्ध त्याला म्हणाले, " बाळ ऊठ. तुला कसला अनुभव आला तें सांग पाहूं. "

शरण म्हणाला, " मी तोल जाऊन खालीं आपटलो. नंतर बेशुद्धींत मला कांहीं जाणतां आलें नाहीं, हाच अनुभव मला आला. "

सिद्ध म्हणाले, " तूं कांहीं न जाणतां राहिलास हेंच खरोखर तूं जाणलें आहेस, आणि हेंच खरोखर स्वरूपज्ञान होय. आतां ती स्थिति ध्यानांत आण ! "

असें सांगून सिद्धांनीं आपला वरद हस्त शरणाच्या डोक्यावर ठेवला. शरणाचे डोळे झांकले होते. त्याला अंतर्यामीं कोटि सूर्यपेक्षां अधिक तेज असलेली आत्मज्योति दिसत होती. त्या ज्योतींत तो एकरूप झाला होता. जेव्हां तो भानावर आला आणि दृष्टि बाहेर टाकली तेव्हां त्याला सर्व जग पालटलेलें दिसलें. त्याला जिकडे पाहावें तिकडे ज्योतीच ज्योति दिसूं लागल्या आणि सर्व जग परमात्म्यानें ओतप्रोत भरलेलें आहे असें त्याला भासूं लागलें. गुरुकृपेनें त्याला स्वरूपज्ञान झाल्यावर आपण आज कृतकृत्य झालों असें त्याला वाटलें. त्याला आनंदाची खाण सांपडली. सिद्धांनीं त्याला सांगितलें, " आतां तूं त्या आत्मस्वरूपाचें ध्यान करीत जा. दृढनिश्चयानें विषयांचा त्याग कर. आपण ज्ञानी झालों असें समजून तूं जर विषयासक्त राहिलास तर तत्काळ तुझें पतन होईल, आणि स्वरूपज्ञानहि नाहींसें होईल. तूं डोळ्यांनीं जे जे विषय अवलोकन करशील त्यांच्या ठिकाणीं ' सोऽहं ' भाव ठेवीत जा आणि त्यांतील द्वैत-भाव सोडून देऊन त्यांच्या ठिकाणीं अद्वितीय आत्मा पाहात जा. ज्ञानें-द्रियांच्या विषयांचें निरसन करणें अत्यंत कठीण आहे. यासाठीं सद्गुरूच्या ठिकाणीं सोऽहम् भाव ठेव आणि चित्तामध्यें जे विषय उत्पन्न होतील ते सद्गुरूप आहेत असें समज. असें केल्यानें अंतर्यामीं निर्विकल्प स्वरूप दिसेल, आणि बाहेरहि तेंच दिसेल. "

अशा प्रकारचा सिद्धांचा बहुमोल उपदेश ऐकून शरणाला धन्यता वाटली. झाडावरून पडल्यामुळें त्याला फार लागलें होतें. सद्गुरूंच्या हस्तस्पर्शानें त्याचें सर्व अंग पूर्ववत् झालें. नंतर सद्गुरूंनीं त्याला मठांत नेलें. त्याला स्नान घालून जेवायला बसविलें आणि त्याला आपल्या हातांनीं पोटभर जेवूं घातलें.

एके दिवशीं सिद्धाश्रमांत एक सद्गृहस्थ आला. सिद्धांनीं त्याला येण्याचें कारण विचारलें असतां तो म्हणाला, " मी विजापूरचा राहणारा असून आपल्या दर्शनासाठीं आलों आहें. आपला शिष्य शरण विजापुराहूनच येथें आलेला असल्यानें मी त्याला ओळखतों. कांहीं वर्षांपूर्वीं षण्मुखस्वामींच्या स्वप्नांत तुम्हीं जाऊन त्यांना सांगितलें, ' उद्यां सकाळीं तुला एक बाळ मिळेल त्याचें पालनपोषण करण्याची तूं व्यवस्था कर ! "

स्वप्नांत हे तुमचे शब्द ऐकून षण्मुखस्वामी जागे झाले तों त्यांना क्षणभर दिव्य प्रकाश दिसला आणि लागलीच पूर्ववत् अंधार झाला. सकाळीं षण्मुख लवकर उठले आणि आपल्या पुष्पवाटिकेंत गेले असतां त्यांना एका झाडाखालीं शुभ्र वस्त्रांत गुंडाळून ठेवलेलें एक सुंदर बालक आढळलें; तें पाहून त्यांना अत्यंत आनंद झाला. त्यांनीं तें बालक उचलून मठांत आणलें. त्या वेळीं मी तेथें होतों. त्यांनीं मला सांगितलें, " तूं हें बालक आपल्या घरीं नेऊन ह्याचें आपल्या मुलाप्रमाणें पालनपोषण कर ! " त्यांच्या आज्ञेप्रमाणें मीं त्याचें पालनपोषण केलें. षण्मुखस्वामींच्या मठाजवळच माझें घर असल्यामुळें मुलाला रोज स्वामींच्या प्रवचनाचा लाभ होऊं लागला. त्याचा काळ सत्संगतींत जात असे. एके दिवशीं मीं सकाळीं उठून पाहतों तों; मुलगा कोठेंहि दिसेना. त्याचा पुष्कळ शोध केला परंतु बरेच दिवस त्याचा पत्ता लागला नाहीं. शोध करतां करतां शेवटीं असें समजलें कीं तो येथें आपल्यापाशीं आला आहे. हें ऐकून मला आनंद झाला आणि आज त्याला येथून नेण्यासाठीं मी आलों आहें. तरी कृपा करून त्याला मझ्याबरोबर जाण्याची परवानगी द्या ! "

सिद्धांनी शरणाला विचारलें, " तूं त्यांच्याबरोबर जातोस कां ? "

शरणानें उत्तर दिलें, " आतां मला लौकिक संगत नको; आतां माझा जो सोक्षमोक्ष होईल तो येथेंच होईल. आपला मठ सोडून आतां मी कोठेंहि जाणार नाहीं ! "

सिद्ध त्या गृहस्थाला म्हणाले, " याचा निर्धार काय आहे तो तुम्हीं ऐकलाच आहे. "

तेव्हां तो गृहस्थ म्हणाला, " त्याला येथें राहावयाचें असेल तर खुशाल राहूं द्या. त्याला येथून घेऊन गेलेंच पाहिजे असा माझा हट्ट नाहीं. तो आपल्याजवळ येथें राहिला तर त्यांत मला आनंदच आहे. "

असें बोलून त्या गृहस्थानें सिद्धांना नमस्कार केला आणि तो आपल्या गांवीं निघून गेला.

✤ ✤ ✤

# भक्तांचा कैवारी : १३

परशुरामपंत या नांवाचा एक गृहस्थ हुबळींत राहत असे. तो एके दिवशीं सिद्धांच्या आश्रमांत येऊन त्यांना म्हणाला, "महाराज, या संसाराच्या त्रासामुळें मी अगदीं गांजून गेलों आहें. आपण दीनांचा उद्धार करणारे आहांत म्हणून मी आपल्याला शरण आलों आहें. आपणच आतां माझें रक्षण करणारे आहांत. माझ्या जिवांत जीव आहे तोपर्यंत आपली सेवा करण्याचा मीं निश्चय केलेला आहे."

परशुरामपंतांचें हें बोलणें ऐकून सिद्धांनीं त्यांना आपल्याजवळ बोलावून घेतलें आणि त्यांच्या कानांत तारकमंत्राचा उपदेश दिला. ते त्याला म्हणाले, "आजपासून तूं संसाराच्या तापत्रयांतून मुक्त झाला आहेस. याच्या पुढें तुला संसाराच्या उपाधीचा त्रास होणार नाहीं. तूं पावन झाला आहेस. आजपासून आमच्या चरित्राचा देशोदेशीं प्रचार करून त्यापासून माणसांचा उद्धार करण्याचें काम आम्हीं तुझ्यावर सोंपविलें आहे."

असें म्हणून सिद्धांनीं आपला वरदहस्त त्याच्या डोक्यावर ठेवला. लागलीच परशुरामपंतांच्या चेहऱ्यावर तेज दिसूं लागलें. त्याला गुरु-हस्ताचा स्पर्श होतांक्षणींच त्याचें चित्त गुरुभक्तींत मग्न झालें.

परशुरामपंतांनीं सिद्धांना प्रार्थना केली कीं, "गुरुमाउली, आपण माझ्यावर फार कृपा केली आहे; तरी आतां आपण आपलें चरित्र लिहिण्याला मला स्फूर्ति आणि आज्ञा द्यावी. 'सिद्धारूढविजय' ग्रंथ लिहावा असें माझ्या मनांत आहे. आपण आज्ञा केली तर आपल्या कृपेनें ग्रंथ लवकर तयार होईल."

परशुरामपंतांचें हें बोलणें ऐकून सिद्धांना अत्यंत समाधान वाटलें आणि सिद्धांनीं त्यांना ग्रंथ लिहिण्याची परवानगी दिली. नंतर सिद्धांना नमस्कार करून ते आपल्या उद्योगाला निघून गेले. पुढें त्यांनीं अवघ्या

एकाच महिन्यांत ' सिद्धारूढविजय ' हा ग्रंथ लिहून पुरा केला आणि तो सद्‌गुरुचरणीं अर्पण केला. नंतर परशुरामपंतांनीं तो सुरस ग्रंथ सिद्धांना वाचून दाखविला. सिद्धांनीं तो आनंदानें ऐकला. नंतर परशुरामपंत गोवा प्रांतांत लोकोद्धारासाठीं गेले. तिकडे गांवोंगांवीं फिरून परशुरामपंतांनीं तो ग्रंथ लोकांना वाचून दाखविला. यामुळें लोकांत भक्तिभाव निर्माण झाला. परशुरामपंतांचें वैराग्य आणि शुद्ध आचरण पाहून लोक त्यांचा सन्मान करीत. प्रत्येक गांवीं त्यांचें भजनकीर्तन आणि चरित्रवाचन होत असे. भक्तजन त्यांना पुढील गांवीं नेत. एकदां परशुरामपंत, त्यांची पत्नी जानकीबाई आणि भक्त मंगेश असे त्रिवर्ग पुढें गेले आणि इतर भक्त मागें राहिले. परशुरामपंत आणि त्यांची पत्नी व मंगेश हुबळी स्टेशनवर आले. गाडीला अतिशय गर्दी असल्यामुळें तिकिटें मिळालीं नाहींत. गाडी चुकली असती तर त्यांना उत्सवाला हजर राहणें अशक्य होतें. आतां काय करावें हें पंतांना सुचेना. त्यांना काळजी लागून राहिली. आतां फक्त सद्‌गुरुरायांनींच कांहीं उपाय करून काळजी दूर केली तर उत्सवाला जातां येईल असें त्यांना वाटलें. पंतांच्या डोक्यांत हा विचार घोळत आहे इतक्यांत एक मनुष्य पंतांजवळ आला आणि " तुम्हांला कोठें जावयाचें आहे ? " असें त्यानें पंतांना विचारलें.

पंत म्हणाले, " आम्हां तिघांना रोण या गांवाला जायचें आहे; पण तिकिटें मिळत नाहींत म्हणून काय करावें हें सुचत नाहीं. "

मग तो मनुष्य पंतांना म्हणाला, " आम्हांलाहि तिकडे जायचें होतें; पण कांहीं कारणानें आमचा बेत रहित झाला. आमच्याजवळ तीन तिकिटें आहेत तीं तुम्हीं घ्या आणि या गाडीनें जा. "

त्यानें पंतांना तिकिटें दिलीं आणि पैसे न घेतां तो घाईघाईनें तेथून निघून गेला. स्टेशनांत गाडी आली. पंत आणि त्यांची मंडळी गाडींत बसलीं आणि मल्लापूर स्टेशनवर उतरलीं. मल्लापूरपासून रोण तीन चार

मैलांवर आहे. परशुरामपंत स्टेशनवर जेव्हां उतरले तेव्हां पाऊस पडत होता आणि रात्रींची वळ असल्यानें अंधारहि होता. यामुळें पायाखालची वाट दिसत नव्हती. त्या वेळीं एक मनुष्य कंदील घेऊन आला आणि " तुम्हांला कोठें जायचें आहे ? " तें विचारूं लागला. पंत म्हणाले, " आतां पाऊस पडत असून रस्ताहि दिसत नाहीं म्हणून रात्रभर गांवांतच कोठें तरी मुक्काम करूं आणि उद्यां सकाळीं उठून रोणला जाऊं. "

तें ऐकून त्या माणसानें पंतांना आणि त्यांच्या बरोबरच्या माणसांना गांवांत नेलें आणि एका घराच्या पडवींत त्यांना सतरंजी टाकून देऊन त्यांची राहण्याची सोय केली. त्या माणसाला त्याचें नांव विचारतां त्यानें आपलें नांव ' सिदप्पा ' असें सांगितलें. जानकीबाईनीं तर्क केला कीं, हा सिदप्पा म्हणजे श्रीसद्‌गुरु सिद्धच असले पाहिजेत. नाहीं तर संकटांत मदत करायला दुसरा कोण धांवून येणार ? सिदप्पा घरांत गेले आणि परत येऊन पंतांपुढें केळीं, दूध आणि साखर ठेवली. पंतांनीं त्याला विचारलें, " तूं हुबळीचा राहणारा आहेस काय ? "

तो म्हणाला, " मी हुबळीचा नसून माझें गांव तुम्हांला कळणार नाहीं. तुम्ही आजची रात्र येथें राहून उद्यां सकाळीं रोणला जा ! "

असें सांगून तो निघून गडद अंधारांत नाहींसा झाला. पंतांना वाटलें कीं हा माणूस सद्‌गुरूच असला पाहिजे. इतक्यांत घरांतील मंडळी बाहेर आली. त्यांनीं पंतांना विचारलें, " तुम्ही कोण आणि येथें कां आलांत ? "

पंतांनीं आपली सर्व हकीगत त्यांना सांगितली. तेव्हां ते म्हणाले, " तुम्ही म्हणतां तो माणूस आमच्या घरांतला नाहीं. तुम्ही कोण आहांत हें सुद्धां आम्हांला माहीत नाहीं. वास्तविक आम्हीं तुम्हांला येथें आश्रय दिलाच नसता. पण तुम्ही सिद्धारूढांचे भक्त आहांत असें तुम्ही आतां सांगितलेंत यामुळें तुम्हीं आतां खुशाल राहा ! "

पंतांनीं त्यांना विचारलें, " तो माणूस जर तुमचा नव्हता तर त्याच्याबरोबर तुम्हीं केळीं दूध आणि साखर कसें पाठविलेंत ? "

यावर घरचा मालक म्हणाला, " आम्हीं तर तुम्हांला कांहींच पाठविलें नाहीं. तो माणूस आमच्या घरांतसुद्धां आला नाहीं. तुम्ही म्हणतांच तर तो सिद्धारूढच असला पाहिजे. त्याला भक्तांची काळजी असल्यामुळें खात्रीनें तोच वेष पालटून आला असला पाहिजे यांत संशय नाहीं. "

तो गृहस्थ सिद्धारूढच असला पाहिजे अशी मालकाच्या मनाची खात्री झाल्यावर तो पंतांना म्हणाला, " खरोखरच सिद्धांच्या भक्तांचे पाय आज आमच्या घराला लागल्यानें आम्ही धन्य झालों आहोंत. आम्ही तुमच्याबरोबर सद्गुरूंना भेटण्यासाठीं अवश्य येऊं. "

मग पुरुषोत्तमपंत आणि त्यांच्या मंडळींनीं ती रात्र तेथेंच घालविली. सकाळीं उठून सर्वजग रोणला जायला निघाले. रोण येथील उत्सव संपवून सर्वजण हुबळीला जाण्याला निघाले. रोण येथें जाण्यापूर्वींच्या रात्रीं पंत ज्या घरीं उतरले होते त्या घरचीं माणसें देखील पतांबरोबर हुबळीस आलीं. त्यांनीं सिद्धांना प्रवासांतील साद्यंत हकीगत निवेदन केली. तेव्हां सिद्ध म्हणाले, " भक्तानें सर्व भार जर आपल्या सद्गुरूवर टाकला तर त्याचा भार सद्गुरूला वाहणें भाग पडतें. तोच भक्तांचा कैवारी असतो. "

* * *

## मृताला संजीवन : १४

सिद्धारूढ हुबळी येथें असतांना ते कांहीं दिवस हुमगेरींत राहात होते. ते तेथें धनगरांच्या मुलांबरोबर खेळत असत. त्या वेळीं लोकांचा उपद्रव त्यांना नको होता. कोणी माणूस दिसला कीं त्याला टाळण्यासाठीं ते तेथून पळ काढीत किंवा एखाद्या झाडावर लपून बसत.

असेच सिद्ध एकदां झाडावर लपून बसले असतां हिरेमठ येथील गुरुपादय्यानें त्यांना पाहिलें. त्या वेळीं त्या झाडाखालीं धनगराची पुष्कळ मुलें जमलीं होतीं. सिद्ध त्या मुलांना दगड मारीत होते. मुलांना दगड लागला कीं ती मोठमोठ्यानें ओरडत. लगेच सिद्ध दुसरा दगड घेऊन 'ॐ नमः शिवाय' असें म्हणून ओरडणाऱ्या मुलाला मारीत. त्याला दुसरा दगड लागल्याबरोबर तो आनंदानें उड्या मारूं लागे. हा प्रकार पाहून गुरुपादय्याला मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें आपल्या मनाशीं विचार केला कीं, "याला लोक वेडा म्हणतात. पण हा वेडा नसून साक्षात् परमेश्वराचा अवतार आहे. याची सेवा घडली असतां आपण मुक्त होऊं. पण मी जर याच्याजवळ गेलों तर हा उपाधिभयानें दूर पळून जाईल."

मग तो हळूंच त्या धनगरांच्या मुलांजवळ गेला आणि त्यांना म्हणाला, "बाळांनो तुम्हांला सिद्धांनीं प्रथम दगड मारले तेव्हां तुम्हीं रडूं लागलांत आणि पुन्हां दुसऱ्यांदा दगड मारले तेव्हां तुम्हीं हंसूं लागलांत, याचें कारण काय?"

मुलें म्हणालीं, "पहिल्या दगडानें आम्हांला दुःख होत असे म्हणून आम्हीं रडत होतों. पण दुसरा दगड लागला म्हणजे आम्हांला मोठा आनंद होई. असा खेळ आम्हीं दररोजच खेळतों."

मग गुरुपादय्यांनीं त्या मुलांना विचारलें, "रोज सिद्ध काय खातात?"

मुलें म्हणालीं कीं, " ते कधीं आमच्याकडून दूध मागवून घेतात, तर कधीं कधीं नुसती माती खाऊन पाणी पितात. "

मग गुरुपादय्याची परीक्षा पाहण्यासाठीं सिद्ध झाडावरून खालीं उतरले. गुरुपादय्यांनीं त्यांना नमस्कार केला. तेव्हां सिद्धांनीं त्याला जोरानें एक लाथ मारली, तरी गुरुपादय्या शांत राहिला. त्यानें सिद्धांना आपल्या घरीं येण्याविषयीं विनंति केली. तेव्हां सिद्ध त्याला म्हणाले, " मला भूक लागली आहे; तरी मला येथेंच कांहीं खायला आणून दे ! "

अय्या अत्यंत दरिद्री होता. तो भिक्षेवर आपला उदरनिर्वाह करीत असे. तो आपल्या घरीं गेला आणि पत्नीला म्हणाला, " मला साक्षात् परमेश्वर भेटला आहे. त्याला भूक लागली असून त्यानें कांहीं तरी खायला मागितलें आहे. तरी आपण भिक्षा मागून आणलेलें अन्न, थोडेंसें आपल्याला ठेवून, बाकीचें त्याला देऊं या ! "

अय्याच्या पत्नीनें पति आणि परमेश्वर यांच्या प्रेमासाठीं थोडें अन्न घरीं ठेवून बाकी सर्व आपल्या पतीजवळ दिलें. अय्यानें तें सिद्धांना नेऊन दिलें; पण सिद्धांची भूक तेवढ्यावर भागली नाहीं. त्यांनीं अय्याला पुन्हां आणखी अन्न घेऊन येण्यास सांगितलें. अय्या घरांतील उरलेलें अन्न घेऊन आला आणि तें सिद्धांना दिलें. घरांतील सर्व अन्न सिद्धांना देऊन टाकल्यामुळें अय्याला त्या दिवशीं उपाशीं रहावें लागलें. परंतु आपल्या हातून सिद्धांची सेवा घडली यांतच त्याला समाधान वाटलें; सिद्धांनीं एक भाकरीचा बारीक तुकडा प्रसाद म्हणून अय्याच्या तोंडांत घातला. त्या वेळीं आपण मिष्टान्न भोजन करीत आहोंत असें त्याला वाटलें.

गुरुपादय्या घरीं जात असतां त्याला दुसरा एक अय्या भेटला. तो गुरुपादय्याला म्हणाला; " तूं त्या सिद्धाच्या हातची भाकरी खाल्लीस यामुळें तूं बाटला आहेस. मी जर ही हकीगत सर्वांना सांगितली तर ते

तुला वाळींत टाकतील. आम्हीहि तुझ्यावर बहिष्कार टाकूं. तरी तूं सिद्धांचा नाद अगदीं सोडून दे ! ”

गुरुपादय्या त्याला म्हणाला, “ तुम्हीं मला वाळींत टाकलेंत तरी हरकत नाहीं पण मी सिद्धांना सोडणें शक्य नाहीं ! इतकेंच नाहीं तर मी त्यांच्यासाठीं माझ्या बायको-मुलांचाहि त्याग करण्यास तयार आहें. सिद्ध हे परमेश्वराचे अवतार आहेत याबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे ! ”

सिद्धांच्या नादीं लागल्याबद्दल त्याच्या बायको-मुलांनींहि त्याची फार निर्भर्त्सना केली; पण त्याचा अय्याच्या मनावर यत्किंचितसुद्धां परिणाम झाला नाहीं. तो घरांत कांहींहि न बोलतां हातांत एक झोळी घेऊन तडक सिद्धांकडे गेला. सिद्ध त्याच्या झोळींत जो प्रसाद देत तो गुरुपादय्या मोठ्या भक्तिभावानें आणि आनंदानें खात असे.

गुरुपादय्यामुळें सिद्धांचे अनेक भक्त झाले. ते सिद्धांना आपआपल्या घरीं नेऊन त्यांचा उपदेश घेत. यामुळें गुरुपादय्याला आनंद होत असे. मग सिद्धांचा प्रभाव जास्त जास्त लोकांच्या दृष्टीस पडूं लागला आणि त्यांची कीर्ति उत्तरोत्तर अधिक पसरली. गुरुपादय्याची भक्ति पाहून लोक थक्क होत. त्याच्यावर लोकांनीं बहिष्कार टाकला होता तो काढून टाकून त्यांनीं पुन्हां त्याला आपल्या जातींत घेतलें.

ताईबाई दाभोळकर या नांवाच्या बाई मुंबई येथें राहात होत्या. त्यांची सिद्धांवर फार भक्ति होती. त्यांच्या घरीं एके दिवशीं एक साधु आला. ताईनीं त्याचा चांगल्या प्रकारें आदरसत्कार केला. त्यांनीं मुलांना पायांवर घातलें. साधु ताईंना म्हणाला, “ तुमची भक्ति पाहून मी फार संतुष्ट झालों आहें. कारण तुमच्यासारखे श्रीमंत लोक क्वचितच श्रद्धावान असतात. हुबळींत एक सिद्धारूढ नांवाचे महान् अवतारी पुरुष राहतात. त्यांच्या केवळ दर्शनानें मनुष्य कृतकृत्य होतो. ”

असें म्हणून त्या साधूनें सिद्धांचें रूप ताईंना दाखविलें.

मग ताई म्हणाल्या, "तुम्हीच आम्हांला परमेश्वर भेटलांत. तरी तुम्हींच आम्हांला हुबळीला सिद्धारूढांकडे घेऊन चला !"

साधु म्हणाला, "तुम्हीं निघायची तयारी करा, मी तुमच्याबरोबर येईन; तोंपर्यंत मी येथेंच राहतों."

ताईंनीं त्या साधूचा यथायोग्य आदरसत्कार केला. ताईंना सिद्धांचें दर्शन घेण्याचा ध्यास लागला होता. त्याच रात्रीं ताईंना एक स्वप्न पडलें. त्यांना साधूनें जसें रूप दाखविलें होतें तसेंच स्वप्नांत त्यांना दिसलें. ताईंनीं त्यांना आसनावर बसविलें आणि त्यांना त्या म्हणाल्या, "महाराज, तुम्हीं आम्हांला नेहमीं दर्शन द्यावें आणि सदैव आपली आमच्यावर कृपा असावी, एवढीच माझी इच्छा आहे."

सिद्धारूढ "तथास्तु" म्हणून अंतर्धान पावले.

सकाळीं ताई झोपेंतून उठल्या. रात्रीं पडलेल्या स्वप्नानें त्यांना अतिशय आनंद झाला होता. त्यांनीं सर्वांना आपलें स्वप्न सांगितलें. सर्वांनीं हुबळीला जाण्याची तयारी केली आणि सर्वजण हुबळीला गेले. तेथें ते सिद्धांच्या आश्रमांत गेल्यावर त्यांना ती सिद्धमूर्ति जेव्हां दिसली तेव्हां त्यांचा आनंद गगनांत मावेना. सिद्धांनीं त्यांना विचारलें, "आपण कोठून आलांत ?" तेव्हां ताई म्हणाल्या, "आम्ही मुंबईहून आपल्या दर्शनासाठीं आलों आहोंत. मला आपण स्वप्नांत दर्शन दिलेंत त्या वेळेपासून आपल्या दर्शनाची उत्कंठा लागून राहिली होती. आपल्या दर्शनानें आज जन्माचें सार्थक झालें !"

ताईंनीं मठांत सिद्धांची पूजा केली आणि कांहीं दिवस तेथें राहून ताई आपल्या मंडळींसह मुंबईस परत आल्या. पुढें दर उत्सवाला ताई आपल्या मंडळींसह सिद्धांच्या दर्शनाला जात असत.

ताईंना तीन मुलें होतीं, मधल्या मुलाचें नांव प्रभाकर. त्याला नलिनी नांवाची एक सुंदर मुलगी होती. ताईबरोबर ती एकदां हुबळीस गेली

होती. तेव्हां दुर्दैवानें तिला विषमज्वराचें दुखणें झालें आणि तिसऱ्या दिवशीं ती देवाघरीं निघून गेली. त्या वेळीं ती अवघी सात वर्षांची होती. अशा प्रसंगीं नलिनीच्या आईच्या शोकाला काय विचारावें ? तिनें रडून आकांत केला. ती सिद्धांना म्हणाली, " स्वामीमहाराज, मी आपल्या चरणांपाशीं आलें असतां हें विपरीत कसें घडलें ? "

ताई म्हणाल्या, " या वेळीं आपण जर कांहीं केलें नाहीं तर आपली अपकीर्ति होईल ! "

इतक्यांत सिद्ध आपल्या मठांतून एकदम उठले आणि ही मुंबईकर मंडळी जेथें उतरली होती तेथें गेले आणि ताईंना विचारलें, " ताई, तुम्ही मला कशाला बोलावलेंत ? "

ताईनें घडलेली हकीगत त्यांना सांगितली तेव्हां सिद्ध नलिनीच्या पार्थिव देहाजवळ गेले आणि त्यांनीं तिच्या अंगावरून हात फिरविला व " कांहीं काळजी करूं नका " असें ताईंना सांगून ते आपल्या आश्रमांत निघून गेले. ते आपल्या आश्रमांत पोहोंचता न पोहोंचतात तोंच झोपेंतून जागी झाल्यासारखी नलिनी आपल्या अंथरुणावर उठून बसली. सर्वांना अतिशय आनंद झाला. सिद्धांच्या अद्‌भुत सामर्थ्याचा सर्वांना प्रत्यक्ष प्रत्यय आला. सिद्धांशिवाय सर्व जग त्यांना तुच्छ वाटूं लागलें.

ताई मुंबईस असतांना हुबळीहून सिद्धांची कांहीं भक्तमंडळी ताईंना भेटण्यासाठीं मुंबईस आली. ताईंनीं त्यांचें उत्कृष्ट आदरातिथ्य केलें. सिद्धांचें गुणकथन चालू असतांना ताईंना सर्व ठिकाणीं सिद्धच दिसत होते. इतक्यांत त्या खोलींत विद्युल्लतेसारखा नेत्रदीपक असा सर्वत्र प्रकाश झळकला. त्यामध्यें ताई कोणालाहि दिसल्या नाहींत. थोडक्याच वेळांत तो प्रकाश कमी झाल्यावर सर्वांनीं ताईंकडे पाहिलें तेव्हां ताई निजधामाला गेल्याचें त्यांना आढळून आलें. ताई खरोखरच अत्यंत पुण्यवान्. त्यांचा एकाएकीं अंत झालेला पाहून सर्वांनाच दुःख झालें.

* * *

## महा प्रयाण : १५

एकदां तिसऱ्या प्रहरीं सिद्धारूढांनीं आपल्या शिष्यांना बोलावून त्यांना " पश्चिमेकडील डोंगराकडे माझ्याबरोबर चला " असें सांगितलें. ते शिष्यांना म्हणाले, " सगळ्यांना पुरतील इतक्या दशम्या आणि आमटी बरोबर घेऊन चला ! " याप्रमाणें तयारी करून सिद्ध पंचवीस निवडक शिष्यांसह आपल्या मठांतून निघाले आणि ते सर्वजण दोन तासांनीं डोंगराच्या माथ्यावर असलेल्या सपाट मैदानावर जाऊन पोहोंचले.

सर्व शिष्यांनीं सिद्धांना एका उच्चासनावर बसवून त्यांची मनोभावें पूजा केली आणि नंतर त्यांनीं सिद्धांच्या भोंवतीं प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. त्या वेळीं शिष्यांचा उत्साह अपूर्व असा होता. आनंदानें प्रदक्षिणा घालण्याचें काम चाललें होतें. बराच वेळ प्रदक्षिणा घातल्यावर शिष्य दमले. तेव्हां सिद्धांनीं त्यांना प्रदक्षिणा थांबवून एकत्र बसण्यास सांगितलें.

नंतर दगडाच्या एका खळग्यांत आमटी आणि दशम्या यांचा एकत्र काला करून सिद्धांनीं प्रत्येक शिष्याच्या तोंडांत त्या काल्याचे घास घातले. शिष्यांनींहि एकमेकांच्या तोंडांत त्या काल्याचे घास घातले. सिद्ध आणि त्यांचे शिष्य त्या वेळीं अगदीं एकरूप होऊन गेले होते. त्यांच्यांतील भेदभाव पार नाहींसा झालेला होता.

हा सोहळा पाहण्यासाठीं आकाशांत खचित देवगण जमला असेल. त्यांना वाटलें असेल कीं, स्वर्गलोकांतील भोग भोगणें सरल्यावर आपणाला पुन्हां मृत्युलोकावर जन्म घ्यावाच लागणार. आजच आपण मृत्युलोकावर असतो तर आपल्याला सिद्धांच्या हातचे दोन घास खावयास मिळाले असते आणि जन्ममरणाच्या फेऱ्यांतून आपण मुक्त झालों असतों.

त्याच वेळीं शिवपार्वती नंदीवरून आकाशमार्गानें चाललीं होतीं. देवांची

गर्दी पाहून पार्वतीला आश्चर्य वाटलें. " भूतलावर असें काय नवल घडलें आहे म्हणून देवांची ही गर्दी जमली आहे? देव मोठ्या कुतूहलानें असें काय पाहात आहेत ? "

असे प्रश्न पार्वतीच्या मनांत उभे राहिले. नंतर शिवपार्वतीला तो भूलोकावरलि काल्याचा समारंभ दिसला. पार्वतीनें " हा साधु कोण ? " असें शंकरांना विचारलें असतां शंकर म्हणाले, " तो सिद्धारूढ असून तो माझाच अवतार आहे. पृथ्वीवर अतिशय पाप झाल्यामुळें सर्व देवांनीं माझी प्रार्थना केली कीं, प्रस्तुत काळीं कलिकाळाची सर्वत्र पीडा होत आहे. लोकांना पापकर्मापासून निवृत्त करून त्यांचा उद्धार करण्यासाठीं आणि दुर्जनांचा लोकांना उपद्रव होऊं नये म्हणून अवतार घेणें आवश्यक आहे. तो अवतार असा असावा कीं, त्यानें भक्तियोगानें लोकांना ज्ञानप्राप्ति करून द्यावी आणि ज्ञानामुळें त्यांना मोक्ष मिळावा. पूर्वीं अनेक अवतार झाले; पण त्यांनीं दुष्टांवर शस्त्र उपसलें आणि त्यांचा संहार केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, हे दुष्ट लोक पुन्हां पुन्हां जन्माला आले; पण त्यांचा दुष्टपणा नष्ट झाला नाहीं. तरी आतां दुष्टांचा संहार न करतां फक्त त्यांच्यांत असलेल्या दुर्गुणांचा नाश केला पाहिजे, अशी मला देवांनीं विनंति केली.

" हें कार्य थोडें अवघड होतें. थोडे दिवस विचार करून मी देवांना, म्हटलें, ' तुम्हीं जर या कामीं साहाय्य दिलें तर मी हें कार्य करीन आणि म्हणून मी सिद्धारूढांच्या रूपानें पृथ्वीवर अवतार घेतला व इतर देव माझे असंख्य भक्त बनले. या अवतारांत मी दुष्टांना न मारतां त्यांना शान्तीनें तारलें आणि साधनसंपन्नांना उत्तम आत्मज्ञान दिलें. त्यामुळें ते माझ्याशीं तादात्म्य पावले. माझा अवतार जरी संपला तरी ते माझें कार्य पुढें उत्तम प्रकारें चालवितील, आणि अज्ञानी लोकांना तारून नेतील. "

हें शंकराचें कथन ऐकून पार्वतीला फार आनंद झाला. मग ती उभयतां कैलासपर्वतावर निघून गेलीं. देव हा सर्व प्रकार पहात होते. सिद्ध प्रत्येक शिष्याला घांस देत होते.

काल्याचा कार्यक्रम चालू असतांना शंकर-पार्वतीच्या संवादाचा वरील प्रकार घडला असा शिष्यांचा विश्वास होता. तो अमान्य करण्याचें कारण काय ?

मग तेथे एक कुष्ठरोगी आला आणि सिद्धांचे पाय धरून म्हणाला, " मज गरिबावर दया करा. माझा देह कुष्ठमय असल्यानें सर्व लोक माझा तिरस्कार करतात. माझा जन्म व्यर्थ होय. मी असून-नसून सारखाच आहें. आतां आपल्या चरणांपाशीं मी जर प्राण सोडला तर मी धन्य होईन असें मला वाटतें. "

सिद्धांचे शिष्य त्याला म्हणाले, " तूं सिद्धांपासून दूर रहा. त्यांना स्पर्श करूं नकोस ! "

शिष्यांनीं त्या कुष्ठी मनुष्याला सिद्धांपासून दूर राहण्यास सांगितलें तेव्हां सिद्ध त्यांना म्हणाले, " बाबांनो, तोहि माझा भक्त आहे. तेव्हां त्याला तसें सांगूं नका! "

नंतर शिष्यांनीं सिद्धांना विचारलें, " हा रोग कसा होतो ? "

सिद्ध त्याचा खुलासा करूं लागले, " कुष्ठ रोगाचे दोन प्रकार आहेत. एक स्थूल व एक सूक्ष्म स्थूल रोग स्थूल देहाला होतो; त्याचीं कारणें सहा आहेत : परदारागमन, दुसऱ्याला फसवून त्याच्या धनाचा अपहार करणें, गुरुनिंदा, मातृगमन, गुरुतल्पगमन आणि निरपराधी मनुष्याला शिक्षा करणें. या महादोषांनीं मुख्यत्वेंकरून हा रोग होतो. शिवाय आई-वडिलांचा द्वेष करणें, आपल्या देवतेव्यतिरिक्त इतर देवतांची निंदा करणें, वगैरे अनेक पापांमुळेंहि हा रोग होतो. सूक्ष्म रोगाचीं लक्षणेंहि सूक्ष्म—न दिसणारीं असतात. तीं म्हणजे दुसऱ्याचा द्वेष किंवा मत्सर करणें, घातपात करणें वगैरे कारणांनीं सूक्ष्म कुष्ठरोग होतो. हीं सर्व लक्षणें लिंगदेहांत

दिसतात. ह्या दोन्ही प्रकारच्या रोगांवर सत्संग व गुरुसेवा हेंच औषध आहे."

हे सिद्धांचे बोल ऐकून सर्वांना धन्यता वाटली. मग सिद्धांनीं त्या कुष्ठी माणसाला काला खायला देऊन त्याच्या अंगावरून आपला हात फिरविला; त्याबरोबर त्याचा कुष्ठरोग नाहींसा होऊन त्याची अंगकान्ति सतेज दिसूं लागली.

मग त्यानें अत्यंत कृतज्ञतेनें सिद्धांना वंदन केलें. सिद्ध त्याला म्हणाले, "तुझा देह म्हणजे माझाच देह आहे असें समज. निरंतर नामस्मरण करीत जा. सर्व प्राणिमात्रावर दया कर आणि दररोज सद्‌गुरुदर्शन घेत जा."

हा अद्‌भुत चमत्कार पाहून देवांनीं सिद्धांच्या नांवाचा जयजयकार केला आणि सिद्धांवर पुष्पवृष्टि करून ते स्वस्थानीं गेले.

नंतर सिद्धांनीं काल्याचा समारंभ संपविला. सर्व शिष्यांना तहान लागली होती. तेव्हां सिद्धांनीं त्यांना तेथें जवळच असलेल्या डबक्यांतील पाणी पिण्यास सांगितलें; पण त्या पाण्यांत किडे वळवळत असल्यानें तें पाणी पिण्यास कोणी तयार होईना. तेव्हां सिद्ध म्हणाले, "तर मग मीच तें पाणी अगोदर पितों."

असें म्हणून त्यांनीं पाण्याला तोंड लावून पाणी पिण्यास सुरुवात केली. सिद्धांच्या तोंडाचा पाण्याला स्पर्श होतांक्षणींच त्यांतील किडे अजीबात नाहींसे झाले आणि पाणी स्वच्छ झालें. सिद्धांचे भक्तहि तें पाणी पिऊन शांत झाले.

पुढें सायंकाळच्या सुमारास सिद्ध व त्यांची भक्त मंडळी तेथून निघून परत मठांत आली.

सिद्धाश्रमांत परस्थ लोकांसाठीं एक इमारत बांधण्याचें काम चाललें होतें. त्या कामीं सिद्धांचे भक्त आपण होऊन हातभार लावीत होते.

आपल्या हातून जास्तींत जास्त मदत व्हावी या हेतूनें हे सर्व भक्त झटत होते.

शिवप्पा नांवाचा सिद्धांचा एक भक्त होता. तो कामासाठीं पुढें सरसावला आणि एका शिडीवर चढला. ही शिडी कोणी धरली नव्हती त्यामुळें ती लटपटत होती. शिवप्पा कसाबसा वरच्या पायरीवर गेला; पण तेथें त्याचा तोल जाऊन तो खालीं कोसळला आणि तेथें असलेल्या दगडावर तो जोरानें आपटला. उंचावरून खालीं आपटल्यामुळें शिवप्पाला जबरदस्त मार लागला आणि त्याची शुद्धि पार नाहींशी झाली. तो अगदीं मरणाच्या पंथाला लागला. म्हणून सिद्धांचे भक्त आणि तेथें जमलेले लोक काळजी करूं लागले. त्याला शुद्धीवर आणण्यासाठीं सर्वजण आटोकाट यत्न करीत होतें. त्यांनीं वैद्याला आणलें. त्यानें शिवप्पाला शुद्धीवर आणण्याचा आटोकाट यत्न केला; परंतु त्याचाहि इलाज चालेना.

शिवप्पाची बायको व मुलें यांना ही बातमी समजली तेव्हां तीं अपघाताच्या ठिकाणीं धांवून आलीं. शिवप्पा मृतप्राय असा पडलेला पाहून तीं भयंकर आक्रोश करूं लागलीं. त्याची पत्नी सिद्धांना म्हणाली, "आतां आम्हांला तुमच्याशिवाय तरणोपाय नाहीं. शिवप्पा उठल्याशिवाय आम्हीं आपले चरण सोडणार नाहीं !"

या वेळपर्यंत स्तब्ध बसलेले सिद्ध शिवप्पाच्या बायको-मुलांच्या शोकामुळें आपल्या जागेवरून उठले आणि शिवप्पाच्या जखमेला आपल्या हातानें स्पर्श केला. त्याच क्षणीं जखमेंतून रक्त येण्याचें थांबलें. नंतर सिद्ध म्हणाले, "याचें आयुष्य संपलें आहे, पण सद्‌गुरूनें याला कांहीं तरी आयुष्य द्यावें."

असें म्हणून त्यांनीं आपला हात शिवाप्पाच्या सर्व अंगावरून फिरविला, आणि ते "नमः शिवाय" म्हणून समाधि लावून बसले.

थोड्याच वेळांत त्या मृत शरिराचे ओठ हालूं लागले व त्याच्या मुखांतून

स्थळप्रत.

रामनाम निघूं लागलें. तें पाहून सर्वांना अत्यानंद झाला. कांहीं दिवसांनीं तो पूर्ण बरा झाला. शिवप्पाची सिद्धांवरील श्रद्धा द्विगुणित झाली आणि तो सिद्धांची सेवा अविरत अशी करूं लागला.

एकदां सिद्ध ज्वरानें भयंकर आजारी पडले. ते अंथरुणाला अगदीं खिळून होते. त्यांचे भक्त चिंताग्रस्त झाले. कित्येकांना ते आजारी पडल्याबद्दल वाईट वाटलें. पुष्कळ माणसांनीं त्यांना औषधोपचार सुचविले. कोणत्याहि औषधानें गुण वाटेना व दुखणें कमी होण्याचें लक्षण दिसेना. मोठमोठे नामांकित वैद्य औषधें देऊन जात; परंतु सिद्ध तीं औषधें घेऊन आपल्या अंथरुणाखालीं ठेवीत.

एकदां एका प्रसिद्ध वैद्याचें औषध चालू असतांना जेव्हां गुण येईना तेव्हां तो वैद्य स्वतः सिद्धांना म्हणाला, " मीं दिलेल्या औषधानें तुम्हांला हमखास गुण यावयास पाहिजे होता; पण ज्या अर्थीं तुमच्या प्रकृतींत कांहींच सुधारणा नाहीं, त्या अर्थीं तुम्हीं माझें औषध मुळींच घेतलें नसेल ! "

सिद्ध म्हणाले, " तुझा आग्रहच असेल तर आतांच तुझ्यासमक्ष औषध घेतों. "

असें म्हणून अंथरुणाखालीं बरेच दिवस साठलेलीं सर्व औषधें त्यांनीं बाहेर काढलीं आणि तीं एकदम खाऊन टाकलीं. त्यामुळें तो वैद्य व इतर माणसें एकदम घाबरून गेलीं. त्यांना वाटलें कीं सिद्धांनीं एकदम सर्व औषधें खाल्लीं याचा परिणाम कांहीं तरी विपरीत होऊन सिद्धांना कांहीं तरी धोका होणार ! तेव्हां सिद्ध म्हणाले, " अरे, तुम्हीं विनाकारण घाबरतां कां ? मला कसलाहि रोग झाला नाहीं. मला शरीर नाहीं, जन्म नाहीं आणि मरणहि नाहीं. मग मला रोग कोठून होणार ? "

असें म्हणून ते नेहमीप्रमाणें हिंडूं फिरूं लागले. यामुळें सर्वांना सिद्धांचा महिमा पुरा कळून आला, त्यांची काळजी निवारण झाली आणि ते आपआपल्या घरीं निघून गेले.

हुबळी शहरांत नारायण मोडक या नांवाचा एक गृहस्थ राहात होता. त्याला चंपू नांवाची एक मुलगी होती. त्यानें तिचें लग्न ठरविलें होतें.

नारायणाची सिद्धांवर अपरंपार भक्ति असल्यामुळें तो सिद्धांकडे गेला आणि त्यानें मुलीचें लग्न जमलें असल्याचें त्यांना सांगितलें व लग्न निर्विघ्न-पणें पार पाडावें अशी त्यांना प्रार्थना केली. तेव्हां सिद्ध त्याला म्हणाले, " तुम्हीं सद्गुरुचिंतन करीत असतां तुमच्या कार्यांत विघ्न कसें येईल ?"

याप्रमाणें सिद्धांनीं आश्वासन दिल्यावर नारायण आनंदानें घरीं आला आणि त्यानें लग्नाची सर्व तयारी केली.

लग्नाला दोन दिवस राहिले. इतक्यांत अकस्मात् एक संकट उद्भवलें. चंपूला ताप आला आणि दुसऱ्या दिवशीं तर तो फारच चढला.

इकडे वऱ्हाड तर येऊन दाखल झालें. त्यांची उतरण्याची वगैरे व्यवस्था लावून नारायण घरीं आला तेव्हां चंपू बेशुद्ध झालेली होती. मनांतल्या मनांत नारायणानें सिद्धांची प्रार्थना केली. तो म्हणाला, " सिद्धनाथा, माझी तुमच्यावर दृढ श्रद्धा आहे. आतां या संकटांतून वांचाविणारा तुमच्यावांचून दुसरा कोणीहि नाहीं. चंपूला मी कोणाचेंहि औषध देणार नाहीं. कार्यांत विघ्न येणार नाहीं अशी आपण मला ग्वाही दिलेली आहे. आतां तिच्यावरच सर्वस्वीं विसंबून बसलों आहें ! "

मनांतल्या मनांत नारायणाची प्रार्थना चालली आहे हें जाणून सिद्ध त्याच्या घरीं आले. खोलीचें दार एकदम उघडलें गेलें आणि सिद्धांची मूर्ति दत्त म्हणून नारायणाच्या समोर उभी राहिली. त्यांना पाहून नारायणाचा आनंद गगनांत मावेना. सिद्ध त्याला म्हणाले, " कांहीं घाबरूं नका. परमेश्वराचें चिंतन करा म्हणजे विघ्न दूर होईल. "

असें म्हणून ते चंपूजवळ गेले आणि त्यांनीं तिच्या अंगावरून आपला हात फिरविला. तिचा ताप तत्काळ उतरला. चंपू तापांतून मोकळी झाल्यानें सर्वांना आनंद झाला खरा; पण दुसऱ्याच दिवशीं तिला देवी आल्यानें

नारायणाला नवीनच काळजी निर्माण झाली. देवी आलेल्या मुलीशीं कोण लग्न करणार ? लग्नाला आलेलें सर्व वऱ्हाड परत जाण्यास निघालें. नारायणानें त्यांना फक्त एक दिवसच राहण्याची आग्रहपूर्वक विनंति केली. तो म्हणाला, " उद्यांपर्यंत सिद्ध काय चमत्कार करतात तो पहा. ते चंपूला नक्कीच बरे करतील ! "

नारायणाच्या विनंतीला मान देऊन व्याह्यांनीं राहण्याचें कबूल केलें.

नारायण सिद्धाश्रमांत गेला आणि सिद्धांना म्हणाला, " सद्‌गुरुराया, आपल्या कृपेनें चंपूचा ताप तर पुरा नाहींसा झाला; पण आतां तर त्याहून भयंकर संकट ओढवलें आहे. काय करावें तें सुचत नाहीं. चंपूला आतां देवी आल्या असून तिचें लग्न मोडूं पाहात आहे. व्याही व इतर वऱ्हाडी परत जाण्याच्या बेतांत आहेत; परंतु त्यांना विनवून एक दिवस येथें ठेवून घेतलें आहे. तरी आपण माझ्या पूजेचा स्वीकार करावा. त्याच्या योगानें माझ्यावर आलेलें संकट निवारण होईल अशी माझी मनोमय खात्री आहे ! "

परमेश्वरावरील श्रद्धेप्रमाणेंच नारायणाची आपल्यावर श्रद्धा आहे हें पाहून सिद्धांना संतोष वाटला आणि ते नारायणाबरोबर त्याच्या घरीं जाण्यास निघाले.

नारायणाच्या घरीं आल्यावर सिद्धांची ती दैदीप्यमान् मूर्ति पाहून व्याहीमंडळी थोडा वेळ आपलें देहभान विसरून गेली. सिद्ध दिव्यासनावर बसल्यावर म्हणाले, " चंपूला आतां बरें वाटेल याबद्दल कोणीहि साशंक राहूं नये. वधुवरांना लग्नाला उभीं करा. "

याप्रमाणें सर्व गोष्टींची सिद्धता झाल्यावर वधुवरांना लग्नासाठीं उभें केलें. मंगळाष्टकाच्या वेळीं खुद्द सिद्धांनीं त्यांच्यावर मंत्राक्षता टाकल्या. चंपूचा आजार पुरा बरा झाला. उलट पूर्वींपेक्षांहि ती जास्त सुंदर दिसूं लागली. यामुळें व्याहीमंडळींची सिद्धांवर नितान्त श्रद्धा बसली. मग तीं

सर्व मंडळी, लग्नाचा सोहळा संपल्यावर कांहीं दिवस सिद्धांच्या सान्निध्यांत राहून आनंदानें आपल्या घरीं निघून गेली.

बागलकोट येथें एक पाटील रहात असे. त्याची सावसावकारी मोठी असून तो अत्यंत श्रीमंत होता. त्यानें देवाचें भजनपूजन कधींहि केलें नाहीं. रात्रंदिवस तो पैशाच्या व्यवहारांत मग्न असे.

त्याला रुक्मिणी नांवाची मुलगी होती. तिला भूतबाधा असल्यानें तिच्या अंगांत भुताचा संचार झाला म्हणजे ती भलतेंसलतें बोलत असे, आणि कधीं कधीं ती आपल्या आईवडिलांना वेड्यावांकड्या शिव्याहि देत असे. पाटलानें मुलीची बाधा नाहींशीं व्हावी म्हणून पुष्कळ पैसा खर्च केला. देवऋषी झाले, मांत्रिक झाले, पुष्कळ देवांना नवसहि केले, पण कांहीं केल्या गूण येईना. यामुळें तिच्या बापानें तिचें लग्नहि केलें नव्हतें. त्याला तिच्याविषयीं नेहमीं काळजी वाटत असे.

एके दिवशीं शरणप्पा नांवाचा सिद्धारूढांचा एक भक्त पाटलाकडे आला. त्यांनीं रुक्मिणीला पाहिलें आणि तिला सिद्धचरित्राचा एक सप्ताह करण्यास सांगितलें. शरणप्पा पाटलाला म्हणाला, " मुलीनें सिद्धचरित्र वाचल्यानें, सिद्ध नामस्मरण केल्यानें आणि सिद्धांच्या चरणाचें तीर्थ तिला दिल्यानें तिची भूतबाधा नष्ट होईल. "

मुलीनें सिद्धांच्या नांवाचा जप सुरू केला; सिद्धचरित्राचें सात दिवसांत पारायण केलें आणि तिच्या वडिलांनीं सिद्धांच्या चरणाचें तीर्थ हुबळीहून आणविलें होतें तेंहि तिनें घेतलें. शरणप्पानें आश्वासन दिल्याप्रमाणें तिची भूतबाधाहि नाहींशीं झाली. यामुळें सर्वांना समाधान झालें.

या सर्व गोष्टी वडिलांच्या मनाप्रमाणें झाल्याकारणानें पाटलांनीं आपल्या सर्व मंडळींसह सिद्ध-दर्शनासाठीं हुबळीस जाण्याचा विचार केला परंतु तिकडे जाण्यापूर्वीं एक नवीनच विघ्न उपस्थित झालें. पाटलाची मुलगी रुक्मिणी सिद्धचरित्र वाचण्यासाठीं एका उंच ओट्यावर असलेल्या

अश्वथ्थ वृक्षाखालीं बसत असे. चरित्रवाचन झाल्यावर ती ओट्यावरून खालीं उतरत असतांना तिला चक्कर आली आणि ती खालीं असलेल्या दगडावर आपटली. तिच्या डोक्याला भयंकर जखम होऊन तिच्यांतून मनस्वी रक्तस्राव झाला आणि त्यांतच तिचें प्राणोत्क्रमण झालें.

पाटील अत्यंत शोक करूं लागले. ते म्हणाले, "सिद्धारूढांच्या चरित्राचें पठण केल्यानें मुलीचें भूत गेलें हें खरें पण त्याच्याबरोबर मुलगीहि गेली. सिद्धारूढा, तुम्हीं काय केलेंत हें? आमच्यावर काय प्रसंग आणलांत? लोक आंता म्हणूं लागतील कीं सिद्धांची भक्ति केल्यानें मनुष्यास हमखास मृत्यु येतो."

अशा तऱ्हेनें तो पाटील आपल्या मुलीच्या मृत्यूला सिद्धारूढांच्या चरित्राचें पठण कारणीभूत झालें असें म्हणत असतां तेथें एक साधु आला. त्याची मुद्रा शांत होती. त्याच्या डोक्याला लाल वस्त्र होतें. तो गौरवर्ण असून त्याच्या अंगावर भगवी शाल होती, गळ्यांत एक रुद्राक्षाची माळ होती. आणि डाव्या हातांत कमंडलु होता.

त्या संन्याशानें पाटलाला विचारलें, "मुलीला काय झालें? तूं शोक कां करतोस?"

पाटील म्हणाला, "आम्हीं सिद्धारूढांची भक्ति केली आणि आमच्यावर हा प्रसंग ओढवला! एका साधूच्या वचनावर भरंवसा ठेवून या माझ्या मुलीनें तिची भूतबाधा नाहींशी व्हावी म्हणून सिद्धचरित्राचा सप्ताह केला आणि सप्ताह संपल्याबरोबर मुलगी चक्कर येऊन दगडावर पडली. तत्काळ प्राण निघून गेला!"

संन्याशी म्हणाला, "मुलीला मृत्यु आला म्हणून सिद्धांना दोष लावूं नका. सिद्ध दयाळु आहेत. भक्ताला संकट पडलें असतां ते लगेच त्याच्या मदतीला धावून जातात आणि त्याच्या संकटाचें निवारण करतात. त्यांनींच मला येथें धाडलें आहे आणि या मुलीच्या तोंडांत घालण्यासाठीं विभूति मजजवळ दिली आहे."

असें म्हणून त्यानें आपल्या बटव्यांतून विभूति काढून ती मरून पड-लेल्या मुलीच्या तोंडांत घातली आणि सिद्धनामाचा गजर केला. तत्काळ त्या मुलीनें आपले डोळे उघडले आणि ती इकडे तिकडे पाहूं लागली. मुलगी जिवंत झालेली पाहून पाटलाच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं.

नंतर पाटील सिद्धांच्या दर्शनाला गेला. मुलगी त्याच्याबरोबर होतीच.

पाटलाला पाहिल्याबरोबर सिद्धांनीं त्याला प्रश्न केला, " मुलीची प्रकृति कशी आहे ? "

सिद्धारूढांना मुलीसंबंधीं कांहीं माहीत नसतां एकदम हा प्रश्न सिद्धांनीं कसा केला याबद्दल पाटील चकित झाला. सिद्ध अंतर्ज्ञानी आहेत याची पाटलाला खात्री पटली.

बरोबर नेलेला नजराणा अर्पण करून, " आमचा उद्धार करावा " अशी पाटलानें सिद्धांना प्रार्थना केली आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन तो परत आपल्या घरीं आला.

एकदां सिद्ध प्रयागाहून गुलसराईला गेले आणि तेथें एका सावकराच्या घरांत जाऊन बसले. येथें कां बसला म्हणून पहारेकऱ्यानें त्यांना विचारलें तेव्हां सिद्धांनीं त्याला उत्तर दिलें कीं, " मुशाफरखाना आहे म्हणून मीं येथें उतरलों आहे. "

पहारेकरी म्हणाला, " हा मुशाफरखाना नसून सावकाराचें घर आहे. "

दोघांचें हें भाषण ऐकून सावकार बाहेर आला आणि त्यानें सिद्धांना विचारलें, " हें आमचें घर असून याला तुम्ही मुशाफरखाना कां म्हणतां ?"

सिद्ध म्हणाले, " या घरांत तुमच्या अगोदर कोण रहात होते ? "

सावकारानें उत्तर दिलें, " माझे वडील "

पुन्हां सिद्धांनीं विचारलें, " तुमच्या वडिलांच्या पूर्वीं कोण राहात होते ? "

सावकार म्हणाला, " माझा आजा. "

मराठी ... ग्रं. स्थळप्रत

सिद्ध म्हणाले, “ तर मग येथें कायम राहाणारा असा कोणीहि नाहीं; आणि म्हणूनच मी या घराला मुशाफरखाना म्हणतो. ”

हें ऐकून सावकाराच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. हा कोणी महात्मा आहे असें समजून त्यानें सिद्धांना घरांत नेऊन त्यांची पूजा केली. त्यांच्या चरणाचें तीर्थ सावकारानें आपल्या आईला दिलें. त्याच्या योगानें तिचा कुक्षिशूल तत्काळ नाहींसा झाला.

सिद्धारूढ चैत्र शुद्ध नवमी शके १७५८ या दिवशीं जन्मले आणि श्रावण वद्य प्रतिपदा शके १८५१ या दिवशीं त्यांनीं आपला भूलोकावरील अवतार समाप्त केला. त्या वेळीं त्यांचें वय ९३ वर्षांचें होतें.

स्वामींनीं एकहि ग्रंथ लिहिला नाहीं. ते सर्वांना उपनिषदांतील वेदान्ततत्त्वांचा बोध करीत असत. कित्येकांना नामस्मरण करण्यास सांगत आणि कांहीं माणसांना शिवपंचाक्षरी मंत्राचा ( नमः शिवाय ) उपदेश देत.

* * *

REFBK-0010958

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ...............

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 90958
ग्रंथशाखा (स्थळप्रत)